| लातूर | वर्ष ३५ वे | अंक ३७ वा | बुधवार, दिनांक २२ एप्रिल २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू. RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

Email-dainiklatursamachar@gmail.com

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

## होर्मुज सामुद्रधुनी खुली करण्यासाठी ३० देश एकवटले

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था : अमेरिका-इस्त्रायल आणि इराण यांच्या सुरू असलेल्या संघर्षात, इराण होर्मुझच्या सामुद्रधुनीचा वापर एखाद्या शस्त्राप्रमाणे करताना दिसत आहे. ही सामुद्रधुनी म्हणजे जगासाठी एक अत्यंत महत्वाचा सागरी मार्ग आहे. मात्र, अमेरिकेची नाकेबंदी आणि इराणनेही हा मार्ग बंद केल्याने अनेक देश मोठ्या ऊर्जा संकटांचा सामना करताना दिसत आहेत. हा मार्ग आता पुन्हा सुरू करण्यासाठी जागतिक पातळीवर काही देश एकत्र आले असून मोठ्या हालचाली सुरू झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर, बुधवारी (२२ एप्रिल) लंडनमध्ये ३० हून अधिक देशांच्या लष्करी नियोजकांची महत्त्वाची बैठक होत आहे.**



महत्वाचे म्हणजे, ब्रिटनच्या संरक्षण मंत्रालयाच्या नेतृत्वाखाली या बैठकीचे आयोजित करण्यात आले आहे. या बैठकीचा मुख्य उद्देश होर्मुझमधून होणारी वाहतूक सुरक्षित करण्यासाठी ठोस लष्करी रणनीती तयार करणे हा आहे. यासंदर्भात बोलताना ब्रिटनचे संरक्षण मंत्री जॉन हीली म्हणाले, केवळ राजनैतिक सहमतीच पुरेशी नाही, तर तिचे प्रत्यक्ष संयुक्त नियोजनात रूपांतर होणेही आवश्यक आहे. तसेच, या बैठकीत लष्करी क्षमता, कमांड आणि कंट्रोल इन्फ्रास्ट्रक्चर तसेच सैनिकांच्या तैनातीवर सविस्तर चर्चा होणार असल्याचे अधिकाऱ्यांनी म्हटले आहे.

**ब्रिटन आणि फ्रान्स या मोहिमेचे नेतृत्व करणार –**

खरेतर, गेल्या आठवड्यातच युरोप, आशिया आणि मध्यपूर्वेतील सुमारे ५० देशांची एका व्हर्च्युअल बैठक पार पडली. यानंतरच या योजनेला गती मिळाली. रॉयटर्सने दिलेल्या वृत्तानुसार, ब्रिटन आणि फ्रान्स या मोहिमेचे नेतृत्व करणार आहेत. दरम्यान, अमेरिकेने इराणसोबतच्या युद्धविरामाचा कालावधी वाढवण्याची घोषणा केली असली तरी होर्मुजमधील आपली नाकेबंदी हटवण्याबाबत अद्याप कोणताही निर्णय घेतलेला नाही.

**कोण कोणते देश होऊ शकतात सहभागी? भारताची भूमिका काय...?**

या मोहिमेत नेमके कोण कोणते देश हसभागी होऊ शकतात, हे अधिकृतपणे सांगण्यात आलेले नाही. मात्र, ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी, जपान, ऑस्ट्रेलिया, इटली, नेरदलँड, स्वीडन, नॉर्वे, फिनलँड, डेनमार्क, पोलंड, बेल्जियम आणि आखाती देशांसह अनेक देश या मोहिमेत सहभीग होण्याची शक्यता आहे. महत्वाचे म्हणजे, या ३० देशांच्या यादीत भारताचा आणि पाकिस्तानचा समावेश असेल की नाही, हे अद्याप अधिकृतपणे समोर आलेले नाही. हे सर्व घडामोडी बघता, होर्मुजमधील तणाव लवकरच कमी होऊन जागतिक तेल पुरवठा सुरळीत होईल, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

## मालेगाव स्फोट प्रकरणात चार आरोपींना दिलासा, उच्च न्यायालयाचा निर्णय

### तपास आणि पुराव्यांवर पुन्हा प्रश्नचिन्ह



**नाशिक/प्रतिनिधी :** मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणात मोठा घडामोडींचा टप्पा गाठत मुंबई उच्च न्यायालयाने महत्त्वाचा निर्णय दिला आहे. २००६ साली झालेल्या स्फोट प्रकरणातील चार आरोपींना न्यायालयाने मोठा दिलासा दिला असून, सत्र न्यायालयाने यांच्याविरोधात निश्चित केलेले आरोप रद्द केले आहेत. या निर्णयामुळे अनेक वर्षांपासून सुरू असलेला खटला आता संपुष्टात येण्याच्या मार्गावर आहे. न्यायालयाच्या या आदेशानंतर आरोपींना दिलासा मिळाला असून, प्रकरणातील तपास आणि पुराव्यांवर पुन्हा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

या प्रकरणात राजेंद्र चौधरी, धान सिंह, लोकेश शर्मा आणि मनोहर नरवारीया या चार आरोपींचा समावेश होता. सत्र न्यायालयाने यांच्यावर हत्या, गुन्हेगारी कट रचणे तसेच युएपीए कायद्यांतर्गत आरोप निश्चित केले होते. मात्र, या आदेशाला आरोपींनी उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. त्यानंतर सुनावणीदरम्यान न्यायालयाने सादर केलेल्या पुराव्यांचा आणि तपास प्रक्रियेचा सखोल आढावा घेतला. अखेर पुरावे अपुरे असल्याचे नमूद करत सत्र न्यायालयाचा आदेशच रद्द करण्यात आला.

सुनावणीदरम्यान राष्ट्रीय तपास यंत्रणेकडून एकही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार सादर करण्यात आला नाही, ही बाब न्यायालयाच्या निर्णयात महत्त्वाची ठरली. घटनेचा प्रत्यक्ष अनुभव सांगणारा साक्षीदार नसल्यामुळे आरोपांची पायाभूत रचना कमकुवत ठरल्याचा मुद्दा आरोपींच्या वकिलांनी मांडला होता. तसेच, यापूर्वीच इतर आरोपींची सुटका झाल्याचा संदर्भ देत हा खटला टिकू शकत नाही, असा युक्तिवादही करण्यात आला. न्यायालयाने या सर्व बाबींचा विचार करत आरोपींना दिलासा दिला.

२००६ मध्ये मालेगाव येथे चार ठिकाणी झालेल्या स्फोटांमध्ये ३१ जणांचा मृत्यू झाला होता, तर अनेक जण जखमी झाले होते. या भीषण घटनेने संपूर्ण राज्य हादरले होते. या प्रकरणात दीर्घकाळ तपास सुरू राहिला आणि अनेक आरोपींवर गुन्हे दाखल करण्यात आले. मात्र, कालांतराने पुराव्यांच्या अभावामुळे आणि तपासातील त्रुटींमुळे खटल्याची दिशा बदलत गेली. याच पार्श्वभूमीवर उच्च न्यायालयाचा हा निर्णय महत्त्वाचा ठरतो.

दरम्यान, २००८ साली झालेल्या मालेगाव स्फोट प्रकरणातही सर्व सात आरोपींची यापूर्वी निर्दोष सुटका झाली होती. त्या प्रकरणातही केवळ संशयाच्या आधारे आरोपींना दोषी ठरवता येत नाही, असे स्पष्ट करत न्यायालयाने त्यांची मुक्तता केली होती. आता २००६ च्या प्रकरणातही तसाच निर्णय आल्याने दोन्ही स्फोट प्रकरणांतील आरोपींना मोठा दिलासा मिळाला आहे. त्यामुळे या संपूर्ण तपास प्रक्रियेवर आणि यंत्रणांच्या कार्यपद्धतीवर चर्चा सुरू झाली आहे. या निर्णयानंतर आरोपींनी न्यायालयाचे आभार मानले असून, आम्हाला उशिरा का होईना पण न्याय मिळाला, अशी प्रतिक्रिया दिली. १७ वर्षांनंतर या प्रकरणाचा निकाल लागल्याने संबंधित कुटुंबीय आणि समाजातही विविध प्रतिक्रिया उमटत आहेत. या स्फोटांमध्ये अनेक कुटुंबांचे आयुष्य उद्ध्वस्त झाले होते. त्यामुळे न्यायालयाच्या या निर्णयानंतर आता पुढे काय घडणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### १८१ दिवसांनंतर उघडले केदारनाथ धामचे कपाट

रुद्रप्रयाग: चारधाम यात्रेच्या चौथ्या दिवशी, बुधवारी सकाळी ८ वाजता केदारनाथ धामचे दरवाजे विधिवत उघडण्यात आले आहेत. परंपरेनुसार, सर्वप्रथम मंदिराचा पूर्वे कडील दरवाजा उघडण्यात आला आणि मुख्य पुजारी, रावळ व हक-हकूकधारकांनी आत प्रवेश करून पूजा-अर्चा सुरू केली. यावेळी, गेल्या वर्षी दरवाजे बंद करताना ज्योतिर्लिंगावर लावलेला भस्म काढून भाविकांना प्रसाद म्हणून वाटण्यात आली.

### प्रभात किरणे

**कितीही करा योगा**
**प्रणायाम दररोज जिम**
**आणि व्यायाम अस्थिर**
**मनस्थिती असेल ताण**
**अशांत जीवन,**
**कासावीस प्राण**

**-इंजि. नागनाथ कलवले लातूर**
**९१-९७६४७ ८८२८८**

## दयानंद शिक्षण संस्थेमध्ये 'फायर फायटर ट्रेनिंग' एक दिवसीय कार्यशाळा



**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद शिक्षण संस्था व लातूर महानगरपालिका आणि श्री साई फायर फायटिंग सेल्स अँड सर्व्हिसेस यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२० एप्रिल २०२६ रोजी दयानंद शिक्षण संस्थेच्या सर्वंच महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांसाठी अग्निशमन सप्ताहानिमित्त 'फायर फायटर ट्रेनिंग' या एक दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन दयानंद विज्ञान महाविद्यालयात करण्यात आलेले होते.याचा मुख्य उद्देश असा होता की, दरवर्षी १४ ते २० एप्रिल हा आठवडा भारतभर आणि विशेषतः महाराष्ट्रात ' अग्निशमन सेवा सप्ताह ' म्हणून अत्यंत गांभीर्याने पाळला जातो.महाराष्ट्र शासनाच्या अग्निशमन संचालनालयामार्फत या काळात राज्यभर विविध सुरक्षा उपक्रम राबविले जातात.याचाच भाग म्हणून दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी व सचिव रमेश बियाणी यांच्या मूळ संकल्पनेनुसार व मार्गदर्शनानुसार या कार्यशाळेचे उत्तम नियोजन करण्यात आलेले होते.या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी दयानंद शिक्षण संस्थेचे शैक्षणिक विकास अधिकारी डॉ.जयप्रकाश दरगड होते.याप्रसंगी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे, प्रमुख मार्गदर्शक लातूर शहर महानगरपालिकेचे प्र.अग्निशमन अधिकारी बापूसाहेब जाधव, श्री साई फायर फायटिंग सेल्स अँन्ड सर्व्हिसेसचे संचालक रमाकांत चाटे, कार्यशाळा समन्वयक डॉ.सुरज कोल्हे, का.लि.फा. लातूर शहरपालिकेचे आनंद शिंदे, लातूर शहर महानगरपालिकेचे फायरमन गिरीश वानखेडे, मनीषा गवळी व प्र. यंत्रचालक संदेश वाढवणे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बापूसाहेब जाधव यांनी प्रत्यक्ष विविध प्रकारच्या आग लागल्यानंतर घ्यावयाची काळजी व कार्यवाही याबद्दल सविस्तर मार्गदर्शन व प्रात्यक्षिक करून दाखवले.ते म्हणाले की, दरवर्षी १४ ते २० एप्रिल या कालावधीत अग्निशमन सेवा सप्ताह साजरा केला जातो. कारण आगीपासून सुरक्षितता, जनजागृती आणि अग्निशमन दलाच्या जवानांच्या बलिदानाचे स्मरण करणे हा मुख्य हेतू आहे.म्हणूनच शाळा, महाविद्यालय, हॉस्पिटल अशा विविधांगी ठिकाणी आगीविषयी जनजागृती झाली पाहिजे. हवा इंधन व उष्णता या तीन गोष्टी एकत्र आल्यानंतर आग लागते.या आगीचे घन पदार्थ, ज्वलनशील द्रव, ज्वलनशील वायू, धातूची आग व इलेक्ट्रिकल आग असे आगीचे विविध वर्ग व प्रकार आहेत. या सॉलिड, लिक्विड व गॅसेस आगीमुळे जिवित व वित्तहानी मोठ्या प्रमाणात होते. घरात वापरला जाणाऱ्या गॅस सिलिंडरमुळे आगी भरपूर लागतात.आपण घाबरून जातो.परंतु न घाबरता गॅसच्या आगीचे प्रशिक्षण घेतले पाहिजे.म्हणूनच आगीवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रशिक्षण घेणे ही आधुनिक काळाची खरी गरज आहे.प्रत्यक्ष आग लागल्यानंतर १०१ किंवा ०२३८२-२२४९४९ या फायर बिग्रेडच्या नंबरवर तात्काळ संपर्क साधावा असेही ते म्हणाले.

अध्यक्षीय समारोप करताना संस्थेचे एडिओ डॉ.जयप्रकाश दरगड म्हणाले, दयानंद शिक्षण संस्थेत सर्वत्र फायर सिस्टीम इन्स्टॉल केलेली असून एखादी अचानक आग लागल्यानंतर आपात्कालीन व्यवस्थापनाची उपाययोजना म्हणून संस्थेच्या सर्वंच कर्मचाऱ्यांना फायर सिस्टीमचे ज्ञान मिळावे व ते ट्रेनड् व्हावेत व त्यांना फायर सिस्टीमचे तंत्रशुद्ध ज्ञान व्हावे हा संस्थेचा मानस व दूरदृष्टी आहे. म्हणूनच ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली असे ते म्हणाले.

प्रास्ताविकातून प्र.प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे यांनी आगीमुळे एखादी मोठी दुर्घटना होऊ नये व कर्मचाऱ्यांना अग्निशमनचे पूर्ण प्रशिक्षण मिळावे या उद्देशातून कार्यशाळा आयोजित करण्यात आली असे त्यांनी सांगितले तर आभार डॉ. सुरज कोल्हे यांनी मानले.सूत्रसंचालन डॉ. श्वेता लोखंडे यांनी केले.याप्रसंगी दयानंद शिक्षण संस्थेच्या सर्वंच महाविद्यालयातील निवडक प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी प्रशिक्षणासाठी उपस्थित होते.

### जेईई परीक्षेत राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाचे यश



**लातूर/प्रतिनिधी :** नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए) द्वारे घेण्यात आलेल्या जेईई मेन्स परीक्षेच्या दुसर्या सत्राचा निकाल जाहीर करण्यात आला आहे. या परीक्षेत लातूरच्या राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करून यशाची परंपरा कायम राखली आहे. या परीक्षेत सोनाली शरद पंचगल्ले हिने ९८.३४ पर्सेंटाईल गुण मिळवत संकुलात प्रथम, प्रथमेश कैलास नागरगोजे ९१.०७ पर्सेंटाईल गुण मिळवत द्वितीय तर सृष्टी अनिल बाहेती ८२.१७ पर्सेंटाईल गुण मिळवत तृतीय आली आहे.

तसेच सार्थक चंद्रकांत वाडकर याने ८०.५७ पर्सेंटाईल, कृष्णा विजयकुमार किसवे ८०, पूजा सचिन किसवे ७२.०८, ओमकार संजय मोहिते ७२, मानसी संतोष मद्दे ७०, अथर्व विश्वनाथ जाधव ६६.८७, प्रणव देवराव निंबुरगे ६२, आरुष भागवत वायकर ५८, तर अदिती गुंडेराव पांढरे हिने ५७ पर्सेंटाईल गुण मिळवत यश संपादन केले आहे. या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्या कविता केंद्रे, समन्वयक अश्विनी केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, समन्वयक वैशाली केंद्रे, समन्वयक राजीव मुंढे, प्राचार्य जी. आर. मुंडे, राजेंद्र जायेभाये, प्रा. बी. बी. खटके, प्रा. ए. एस. खोत, प्रा. ए. व्ही. क्षीरसागर, प्रा. डी. ए. फंड, प्रा. वैशाली पाटील, विष्णू कराड, परमेश्वर गित्ते यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

### कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



**राज्यात शुक्रवार पर्यंत वादळी पाऊस,गारपीट...**

### चिमटा दयाचा



**संपकरी संपावर आहेत!**
**जनतेचे हाल**
**होत आहेत !!**
**एकीकडे मोठ्या**
**प्रमाणात बेकारी तर**
**दुसरीकडे संपकरी !!!**

## लातूर जिल्ह्यातील ३५ हजार कर्मचारी बेमुदत संपात सहभागी

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील सरकारी, निमसरकारी कर्मचारी, तसेच शिक्षक -शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी आता थेट संघर्षाचा मार्ग अवलंबण्याचा निर्णय घेतला असून २१ एप्रिल म्हणजे आज पासून बेमुदत संपाची प्रशासकीय इमारत येथून त्याची सुरवात केली. जिल्ह्यातील सुमारे ३५ हजार कर्मचारी-शिक्षक गेल्या १५ महिन्यांपासून शासनाच्या कारभारावर नाराज आहेत. प्रलंबित मागण्यांकडे सातत्याने दुर्लक्ष करण्यात येत असल्याचा आरोप हे कर्मचारी करीत आहेत. गेल्या वर्षभरात विविध संघटनांनी सात वेळा आंदोलन करूनही शासनाने ठोस भूमिका घेतली नसल्याने अखेर संपाचा निर्णय घेतल्याचे लातूर समन्वय समितीचे अध्यक्ष बी. बी. गायकवाड व निमंत्रक संजय कलशेट्टी यांनी सांगितले.

कर्मचारी संघटनांनी मांडलेल्या प्रमुख मागण्यांमध्ये सुधारित राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेबाबत स्पष्ट नियम जाहीर करणे, १ मार्च २०२४ पासून निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना तात्पुरते निवृत्ती वेतन देणे, तसेच सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत (१०:२०:३०) लाभ द्यावा आदींचा समावेश आहे. याशिवाय, निवृत्तीचे वय ६० वर्षे करण्याची मागणीही पुन्हा जोर धरत आहे. देशातील बहुतेक राज्यांमध्ये हा निर्णय लागू झाल्याचा दाखला देत महाराष्ट्रातही तो लागू करावा, अशी मागणी कर्मचारी संघटनांनी केली आहे.राज्यातील शासकीय विभागांमध्ये सुमारे ३५ टक्के पदे रिक्त असल्यामुळे कामाचा अतिरिक्त ताण वाढत असल्याचेही निदर्शनास आणण्यात आले आहे. तसेच, चतुर्थश्रेणी व वाहन चालकांच्या भरतीवर घातलेली बंदी, कंत्राटी कर्मचाऱ्यांचे नियमितीकरण, तसेच सर्व कर्मचाऱ्यांसाठी व्यापक रोकडविरहित (कॅशलेस) आरोग्य विमा योजना लागू करण्याच्या मागण्या प्राधान्याने मांडण्यात आल्या आहेत.

जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करणे, नगरपालिका व नगरपरिषदांतील कर्मचाऱ्यांच्या आकृतीबंधाचा प्रश्न सोडवणे, तसेच दीर्घकाळ कंत्राटी पद्धतीवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना नियमित सेवेत घेणे या मुद्द्यांवरही शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.एकूण १८ प्रलंबित मागण्यांकडे शासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याची भावना कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झाली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील कर्मचारी - शिक्षक आज पासून बेमुदत संपावर गेले असल्याने प्रशासनासमोर मोठे आव्हान उभे राहण्याची शक्यता आहे. दरम्यान, या संपाचा परिणाम




शासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालये, तसेच विविध सार्वजनिक सेवांवर होण्याची शक्यता असून, शासनाने तातडीने हस्तक्षेप करून तोडगा काढावा, अशी मागणी होत आहे.

सर्व विभागनिहाय संघटनांनी प्रशासकीय इमारत, जुने जिल्हाधिकारी, लातूर येथे एकत्रीत येऊन बेमुदत संपात १०० टक्के सहभागी होऊन मागणी बाबत आपला रोष व्यक्त केला. समाज कल्याण कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष बालाजी चव्हाण आदी कार्यालयीन विभाग संघटनांनी आपल्या कार्यालयातील प्रांगणात सहभागी होऊन बेमुदत संप यशस्वी केला.यावेळी मध्यवर्ती संघटनेचे राज्य सहसचिव तथा जिल्हा सरचिटणीस एस बी कलशेट्टी, सहकार विभागाचे संघटक जे. जी. जाधव, पोलीस अधीक्षक संघटनेचे अध्यक्ष राजेश्वर कुलकर्णी, संघटनेचे उपाध्यक्ष बालाजी पांचाळ, धर्मादाय कार्यालय अध्यक्ष प्रशांत बडीकर, भूमी अभिलेख संघटनेचे उपाध्यक्ष घुगे, संघटनेचे उपाध्यक्ष जिल्हा माहिती कार्यालयातील विवेक डावरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

### मंत्रिमंडळ निर्णय (संक्षिप्त)

महाराष्ट्र राज्य कॉम्प्रेस्ड बायोगॅस धोरण (सिबीजी), २०२६ जाहीर प्रत्येक जिल्ह्यात समन्वय समिती, बायोगॅस प्रकल्प पीपीपी, हायब्रीड अन्युईटी तत्वावर राबवणार. यावर्षासाठी पाचशे कोटींची तरतूद. घनकचऱ्याचे पर्यावरणपूरक व्यवस्थापन, हरित गृह वायू उत्सर्जन कमी होणार.

(नगर विकास विभाग )

राज्यातील सात आदर्श महाविद्यालयातील शिक्षकांना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार मूळ वेतन मिळणार. या पदावरील शिक्षकांना उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या पद भरतीमध्ये अतिरिक्त गुण मिळणार.

(उच्च व तंत्रशिक्षण विभाग)

सातारा जिल्ह्यातील मौजे नागेवाडी येथे आय. टी. पार्कला जमीन देण्याचा निर्णय. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास ४२. ५५ हेक्टर जमीन देण्यात येणार. सातारा जिल्हा आणि परिसरातील आयटी क्षेत्राला प्रोत्साहन, युवकांना रोजगार - व्यवसायाच्या संधी.

(महसूल विभाग)

राज्यातील कमाल जमीन धारणा मर्यादा नियमानुसार भोगवटादार वर्ग - २ मधून भोगवटादार वर्ग - १ मध्ये रुपांतरणाच्या अधिमुल्याची पुनर्रचना. याबाबतची अधिसूचना काढण्यास मान्यता.

(महसूल विभाग)

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

## वाढती उष्णता, काळजीचे कारण...

भारतातच काय जगात वाढते तापमानावर चिंता व्यक्त केली जात आहे. देशातील काही राज्यात वाढत्या तापमानाचा तडाखा मोठ्या प्रमाणात बसला असून जीवन जगणे आवघड बनले आहे. दिवसातर उष्णतेमुळे पाणी-पाणी होते तर रात्र काढणे आवघड होत आहे. एवढी उष्णता निर्माण झाली आहे. वरचेवर वर्षानुवर्षे तापमानात वाढ होत आहे. तसे पाहिले तर हे जागतिक संकट आहे, जगच या समस्यावर चिंतेत आहे. तरी या बाबत गांर्भीयाने विचार केला जात नाही. कोणताही ठोस निर्णय घेतला जात नाही. यामागील कारणांचा विचार करून सोडवणुक केली जात नाही. ही मोठी शोकांतिका आहे. मुळात आपल्या देशात वाढती उष्णतेबाबत चिंतन होत नाही व चिंताही व्यक्त केली जात नाही. उपया वर-वर केले जातात. त्यामुळे या बाबत आता तरी सर्वांनी मिळून मार्ग काढला पाहिजे. त्याबरोबर कठोर निर्णया बरोबर उपायोजनाची गरज आहे. वरचे-वर शहरीकरण होत आहे. सिंमेंट कॉंक्रेटची जंगले निर्माण होत आहेत. समुद्र हाटवुन मोठ-मोठी बिल्डिंग उभा केल्या जात आहेत. डोंगर, समुद्र, नद्या व मोठी पर्वत रांगा ह्या निसर्गनिर्मित आहे. जंगले कोणी निर्माण केली नाहीत तर ती निसर्गनिर्मित आहेत. त्याचा मानव ऱ्हास करीत आहे. नष्ट करीत आहोत, त्यामुळे नैसर्गिक संकटे निर्माण होत आहे. मोठा परिणाम भोगावा लागत आहे. माणूस स्वार्थी बनला आहे. त्यामुळे संकट ओढावुन घेत आहेत. मानवाने काही संकटे निर्माण केली आहेत. देशात अनेक राज्य वाळवंट होत आहेत. पावसाचे प्रमाण कमी झाले आहे. वृक्षतोडीमुळे हवेतील ऑक्सीजनचे प्रमाण घटले आहे. शहरात श्वास घेणे आवघड होत आहे. एवढी उष्णता निर्माण होत आहे. पुर्वी व सध्याचे वृक्षाचे प्रमाण लक्षात घेतले तर पंचवीस टक्के झाडी ठेवली असून पंच्याहत्तर टक्के झाडे नष्ट केली आहेत. त्यामुळे निसर्ग लहरी बनला आहे. ऋतूचक्र बदलले आहे. देशात समसमान पाऊस नाही. एखाद्या राज्यात अफाट पाऊस पडल्याने जनजीवन विस्कळीत होते तर एखाद्या राज्यात पाण्यासाठी तडफावे लागत आहे. पाण्याचा पत्ताच नाही. असे का होते यावर विचार केला जात नाही. अजूनही परिस्थिती हाता बाहेर गेलेली नाही. यात सुधारणा करू शकतो. ते शक्य करावयाचे झाले तर सरकारने कडक कायदा व त्याची अमलबजावणी सुरु केली पाहिजे. सरकारची भिती निर्माण झाली पाहिजे. आपण जर निसर्गाची हानी केली, वाटोळे केले तर आपणांस मोठी शिक्षा होवू शकते, असे जेंव्हा लक्षात आल्यावर नागरिक चांगले वागतील व निसर्गाचा ऱ्हास कमी होवू शकेल. नगारिकांना किती ही सांगा. रुग्णालयात ऑक्सीजनसाठी सेंकंदाला पैसे मोजतील मात्र मोकळ्या ठिकाणी, घराच्या आंगणात वडाचे किंवा पिंपळाचे झाड लावणार नाहीत. कुंड्यात फायदा नसणारी झाडे लावतील मात्र उपयोगी झाडे लावणार नाहीत. कडू लिंबाचे झाड किती औषधी आहे. आरोग्यास लाभकारक आहे. त्याचे झाड लावले जात नाही. वृक्ष किती महत्त्वाची आहेत, हे केंव्हा लक्षात येईल ते सांगता येत नाही. ग्रामीण भागात तर मोठी दशा आहे. शेतात आजोबा-पंजोबानी लावलेली शेकडो वर्षांची झाडे तोडून विकून खाल्ली गेली, राणात सावलीसाठी झाड सापडत नाही, मग निसर्ग साथ कसा देणार, शुद्ध ऑक्सिजन कसा मिळणार, आता एप्रिल महिणा चालू आहे. आगामी मे महिण्यात तर कडक उन्हाचा चटखा बसणार आहे. अशा वेळी लहान मुले व वृद्धांना मोठा त्रास सोसावा लागणार आहे. उष्णघातामुळे मृत्यूची शक्यता नाकारता येत नाही. उन्हाळ्यात कितीही काळजी घेतली तरी नैसर्गिक जीवन व कृत्रिम जीवन यात फरक आहे. एसी किंवा कुलरची हवा आरोग्यासाठी योग्य नाही. तीच निसर्गाची हवा आरोग्यास मानते हे सर्वांना कळते तरी निसर्गाचा ऱ्हास केला जातो हे योग्य नाही. पहिल्यांदा सरकारने कडक कायदा व नियोजन करण्याची गरज आहे. प्रत्येकांनी पाच झाडे लावली पाहिजेत तरच सरकारी स्वस्त धान्य दुकानातून मोफत धान्य मिळेल, घराचा कर कमी होईल नसता तीनपट लावला जाईल. असे फर्मान काढावे. कोणतीही मोफत योजनेचा लाभ मिळणार नाही अशी काही सक्ती करणारी उपायोजना केली पाहिजे. केवळ वर-वर उपायोजना करणे बंद केले पाहिजे. निसर्गाचा ऱ्हास करणे किती तरी मोठे पाप आहे. आपल्यानंतर आपल्या पाल्यास पशु-पक्षी किंवा चिमणी अशी दिसत होती असे चित्राद्वारे दाखविणार का? मुळात पक्षाची संख्या निसर्गाच्या ऱ्हासमुळे कमी झालेली आहे. राणात पक्षी दिसून येत नाहीत. जंगली प्राणी वस्त्याकडे वळले आहेत. जंगलातील अनेक प्राणी वस्तीकडे अन्न व पाण्याच्या शोधासाठी येत आहेत. भितीपोटी मानवावर हल्ला करीत आहेत. त्यामुळे वस्त्यामध्ये राहाणारी मंडळी भयभीत झाली आहे. सध्याला दिवसा आकरा वाजले की, उन्हाचा तडाखा बसत आहे. सायंकाळी उशीरा थोडा दिलासा मिळत आहे. देशात अनेक राज्यात उन्हाचा तडखा जाणवत आहे. त्यामुळे मानवाने या संकटाबाबत विचार करून मात कशाप्रकारे करता येईल याचा विचार केला पाहिजे. वाढते उष्णता ही बाब जगात चिंतेची आहे. जगच याबाबत विचार करीत आहे मात्र ठोस तोडगा काढला जात नाही. वाढत्या उष्णतेमुळे पाण्याची पातळी खोलवर गेली आहे. पिण्याची समस्या आता पासून निर्माण होत आहे. पाण्याच्या नियोजनासाठी दरवर्षी पाण्यासारखा पैसा खर्च केला जातो आहे. निसर्गाचा समतोल राखण्यासाठी एकमेव मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड व त्याची जोपासणा हे महत्त्वाचे आहे. नुसते झाडे लावुन चालणार नाही तर त्यांची जोपासना केली पाहिजे. एक घर पाच झाडे व शेतात किमान दहा झाडे लावण्याची व ती जोपासण्याची सक्ती केली पाहिजे तरच जीव सृष्टि जगेल नसता काय होईल याचा विचारच केलेला बरा! त्यामुळे सध्याला उष्णतेपासून कसा बचाव करात येईल याचे नियोजन करावे. उन्हाळा कसा सुखकर जाईल याचा विचार केला पाहिजे. यावर्षी अधिक उन्हाळ्याची झळ पोंहचत आहे. कठिण उन्हाळा जाणार आहे. आता पासून जीवाची लाही-लाही होत आहे. त्यामुळे याबाबत विचार करून एकमेव हाती असलेली बाब म्हणजे मोठ्या प्रमाणात झाडे लावणे हा आहे हे लक्षात घेतले पाहिजे.

# वसुंधरेची आर्त हाक : विकासाच्या वाटेवर शाश्वतपणाचा ध्यास

दरवर्षी २२ एप्रिल हा दिवस 'जागतिक वसुंधरा दिन' म्हणून साजरा केला जातो. हा केवळ दिनविशेष नसून पृथ्वीवरील जीवनाच्या अस्तित्वाशी निगडित असलेली एक गंभीर जाणीव आहे. मानवाने विज्ञान-तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे अभूतपूर्व विकास साधला असला तरी या विकासाच्या बदल्यात पृथ्वीच्या संसाधनांवर प्रचंड ताण निर्माण झाला आहे. हवामान बदल, प्रदूषण, जंगलतोड, जैवविविधतेचा ऱ्हास, जलसंकट यांसारख्या समस्यांनी आज संपूर्ण जगाला वेढले आहे. अशा परिस्थितीत वसुंधरा दिन हा केवळ उत्सव म्हणून नव्हे, तर आत्मपरीक्षणाचा दिवस म्हणून पाहणे आवश्यक आहे. पृथ्वी ही आपली केवळ राहण्याची जागा नसून ती आपली 'आई' आहे, जी आपल्याला अन्न, पाणी, हवा आणि जीवन देत असते. त्यामुळे तिच्या रक्षणाची जबाबदारी ही प्रत्येकाची नैतिक कर्तव्य आहे.

वसुंधरा दिनाची सुरुवात १९७० साली झाली. पर्यावरणाच्या रक्षणासाठी लोकांमध्ये जागृती निर्माण करण्याचा हा एक मोठा जागतिक उपक्रम ठरला. सुरुवातीला काही देशांपुरता मर्यादित असलेला हा दिवस आज जगभरातील जवळपास सर्व देशांमध्ये साजरा केला जातो. या दिवसाच्या निमित्ताने पर्यावरण संवर्धनाचे विविध कार्यक्रम, मोहिमा, जनजागृती उपक्रम राबवले जातात. परंतु केवळ एक दिवस साजरा करून पर्यावरण वाचणार नाही, तर हा विचार आपल्या दैनंदिन जीवनात रुजवणे गरजेचे आहे.

आजच्या घडीला पर्यावरणीय संकटाचे स्वरूप अत्यंत भीषण झाले आहे. औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि वाढती लोकसंख्या यामुळे नैसर्गिक संसाधनांचा अतिरेकाने वापर होत आहे. जंगलांची मोठ्या प्रमाणात तोड केली जात आहे, ज्यामुळे वन्यजीवांचे अधिवास नष्ट होत आहेत. नद्या, तलाव आणि समुद्र प्रदूषणाने ग्रासले आहेत. हवेत विषारी वायूंचे प्रमाण वाढले आहे. या सर्व घटकांमुळे पृथ्वीचे तापमान वाढत आहे, ज्याला 'जागतिक तापमानवाढ' असे म्हणतात. या तापमानवाढीमुळे हिमनद्या वितळत आहेत, समुद्राची पातळी वाढत आहे आणि नैसर्गिक आपत्तींचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे मानवी जीवनच धोक्यात आले आहे.

हवामान बदल हा आजच्या काळातील सर्वात गंभीर प्रश्न आहे. पावसाचे चक्र विस्कळीत झाले आहे. काही ठिकाणी अतिवृष्टी होत आहे, तर काही ठिकाणी दुष्काळाचे संकट निर्माण होत आहे. कृषी क्षेत्रावर याचा मोठा परिणाम होत आहे. शेतकऱ्यांना पिकांचे नुकसान सहन करावे लागत आहे. अन्नसुरक्षेचा प्रश्न निर्माण होत आहे. त्यामुळे पर्यावरणीय समस्यांचा परिणाम केवळ निसर्गावरच नव्हे, तर मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रावर होत आहे.

पर्यावरणाच्या ऱ्हासामागे मानवी हस्तक्षेप हा प्रमुख कारण आहे. 'विकास' या नावाखाली आपण निसर्गाचा विनाश करत आहोत. मोठमोठे प्रकल्प, धरणे, रस्ते, कारखाने यासाठी जंगलांची तोड केली जाते. नद्या वळविल्या जातात. खनिज संपत्तीच्या उत्खननासाठी पर्वत उध्वस्त केले जातात. या सर्व प्रक्रियेमुळे पर्यावरणाचा समतोल बिघडतो. निसर्गाच्या या असंतुलनाचा परिणाम शेवटी मानवावरच होतो. त्यामुळे विकास आणि पर्यावरण यामध्ये समतोल साधणे अत्यंत आवश्यक आहे.

'शाश्वत विकास' ही संकल्पना याच पार्श्वभूमीवर पुढे आली आहे. शाश्वत विकास म्हणजे असा विकास, जो वर्तमान पिढीच्या गरजा पूर्ण करताना भविष्यातील पिढ्यांच्या गरजांवर परिणाम करत नाही. म्हणजेच, नैसर्गिक संसाधनांचा वापर करताना त्यांचे संवर्धन आणि पुनर्निर्मिती यांचा विचार करणे आवश्यक आहे. ऊर्जा, पाणी, जमीन यांचा वापर मर्यादित आणि योग्य पद्धतीने करणे गरजेचे आहे. पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा वापर, नवीकरणीय ऊर्जेचा अवलंब, कचऱ्याचे पुनर्वापर यांसारख्या उपाययोजना यासाठी महत्त्वाच्या आहेत.

जैवविविधता ही पृथ्वीवरील जीवनाचा पाया आहे. विविध प्रकारचे वनस्पती, प्राणी, सूक्ष्मजीव यामुळे पर्यावरणाचा समतोल राखला जातो. परंतु मानवी क्रियांमुळे जैवविविधतेचा ऱ्हास होत आहे. अनेक प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. यामुळे पर्यावरणीय संतुलन बिघडत आहे. त्यामुळे जैवविविधतेचे संरक्षण करणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी जंगलांचे संवर्धन, वन्यजीव संरक्षण, नैसर्गिक अधिवासांचे जतन यावर भर देणे गरजेचे आहे.

जलसंकट ही आणखी एक गंभीर समस्या आहे. पाणी हे जीवनासाठी अत्यावश्यक आहे. परंतु आज अनेक भागांमध्ये पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे. भूजलाचा अतिरेकाने वापर, पावसाच्या पाण्याचा अपुरा साठवण, नद्यांचे प्रदूषण यामुळे जलस्रोत आटत आहेत. त्यामुळे पाण्याचे संवर्धन करणे अत्यंत आवश्यक आहे. पावसाचे पाणी साठवणे, पाण्याचा योग्य वापर, जलप्रदूषण रोखणे यांसारख्या उपाययोजना करणे गरजेचे आहे.

कचरा व्यवस्थापन हा देखील पर्यावरण संवर्धनाचा एक महत्त्वाचा भाग आहे. प्लास्टिकचा वाढता वापर हा पर्यावरणासाठी मोठा धोका ठरला आहे. प्लास्टिक विघटनास खूप वेळ लागतो, त्यामुळे ते जमिनीवर, पाण्यात साचून राहते आणि प्रदूषण वाढवते. त्यामुळे प्लास्टिकचा वापर कमी करणे, पुनर्वापर करणे आणि पर्यावरणपूरक पर्यायांचा अवलंब करणे आवश्यक आहे. 'कमी करा, पुनर्वापर करा आणि पुनर्चक्रण करा' हा मंत्र अंगीकारणे गरजेचे आहे.

पर्यावरण संवर्धनात शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी शिक्षण प्रणालीत पर्यावरण शिक्षणाचा समावेश करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना लहानपणापासूनच पर्यावरणाचे महत्त्व पटवून देणे गरजेचे आहे. तसेच समाजातील प्रत्येक घटकाने पर्यावरण संरक्षणाची जबाबदारी स्वीकारणे आवश्यक आहे.

शासन आणि धोरणे यांचीही पर्यावरण संवर्धनात महत्त्वाची भूमिका आहे. पर्यावरणपूरक धोरणे राबवणे, प्रदूषण नियंत्रणाचे नियम कडक करणे, नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण करणे यासाठी शासनाने प्रभावी पावले उचलणे आवश्यक आहे. परंतु केवळ शासनाच्या प्रयत्नांवर अवलंबून राहून चालणार नाही, तर प्रत्येक नागरिकानेही आपल्या स्तरावर प्रयत्न करणे गरजेचे आहे.

आजच्या काळात तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून पर्यावरण संवर्धन शक्य आहे. सौर ऊर्जा, वारा ऊर्जा, जल ऊर्जा यांसारख्या नवीकरणीय ऊर्जेचा वापर वाढवणे गरजेचे आहे. ऊर्जा कार्यक्षम उपकरणांचा वापर, हरित इमारतींची उभारणी, स्मार्ट शहरांची संकल्पना यामुळे पर्यावरणावरचा ताण कमी होऊ शकतो.

वसुंधरा दिनाच्या निमित्ताने आपण प्रत्येकाने काही ठोस संकल्प करणे आवश्यक आहे. झाडे लावणे, पाणी वाचवणे, कचरा कमी करणे, पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारणे यांसारख्या लहान उपाययोजना देखील मोठा फरक घडवू शकतात. पर्यावरण संवर्धन ही केवळ जबाबदारी नसून ती आपल्या अस्तित्वाची गरज आहे.

समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहिले तर पर्यावरणीय समस्या या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय घटकांशी निगडित आहेत. विकासाच्या प्रक्रियेत निर्माण होणारी विषमता, संसाधनांचे असमान वितरण, गरिबी, लोकसंख्येचा दबाव यामुळे पर्यावरणावर ताण वाढतो. त्यामुळे पर्यावरण संवर्धनासाठी समग्र दृष्टिकोन आवश्यक आहे, ज्यामध्ये सामाजिक न्याय, आर्थिक विकास आणि पर्यावरण संरक्षण यांचा समतोल साधला जाईल.

शेवटी, वसुंधरा दिन हा आपल्याला एक महत्त्वाचा संदेश देतो की, पृथ्वी ही आपली मालमत्ता नसून आपण तिचे केवळ पालक आहोत. पुढील पिढ्यांसाठी ही पृथ्वी सुरक्षित आणि समृद्ध ठेवणे ही आपली जबाबदारी आहे. जर आपण आज योग्य पावले उचलली नाहीत, तर भविष्यातील पिढ्यांना गंभीर परिणामांना सामोरे जावे लागेल. त्यामुळे आता वेळ आली आहे, की आपण विकासाच्या नव्या वाटा शोधू, ज्या पर्यावरणपूरक आणि शाश्वत असतील. वसुंधरेच्या संरक्षणासाठी प्रत्येकाने आपले योगदान दिले, तरच पृथ्वीवरील जीवनाचा प्रवाह अखंडित राहील.

**डॉ. राजेंद्र बगाटे**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

# नारी शक्ती वंदन अभियान : सर्वसमावेशक स्त्री सक्षमीकरणासाठी शासनाचा व्यापक उपक्रम

भारतीय राज्यघटनेने स्त्री-पुरुष समानतेचा मूलभूत अधिकार प्रदान केला असला तरी सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक क्षेत्रांमध्ये महिलांना अद्याप विविध अडचणींना सामोरे जावे लागते. या पार्श्र्वभूमीवर महिलांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी व त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात अधिक सक्षमपणे सहभागी करून घेण्यासाठी शासनाने नारी शक्ती वंदन अभियान हा महत्त्वपूर्ण व सर्वसमावेशक उपक्रम हाती घेतला आहे.

**१. अभियानाची पार्श्वभूमी :**

देशातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी अनेक वर्षांपासून विविध योजना राबविण्यात येत आहेत. तथापि, बदलत्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीनुसार महिलांच्या गरजा व अपेक्षा अधिक व्यापक झाल्या आहेत. या गरजांचा विचार करून महिला सक्षमीकरणाच्या प्रक्रियेला गती देण्यासाठी एकात्मिक दृष्टीकोनातून नारी शक्ती वंदन अभियानाची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

**२. अभियानाची दृष्टी व ध्येय :**

या अभियानाची दृष्टी सशक्त महिला - सक्षम राष्ट्र अशी असून महिलांना स्वावलंबी, आत्मनिर्भर व निर्णयक्षम बनविणे हे त्याचे मुख्य ध्येय आहे.

यासाठी खालील बाबींवर विशेष भर देण्यात येतो -

- महिलांना समान संधी व अधिकार प्रदान करणे
- सामाजिक न्याय व सुरक्षिततेची हमी देणे
- आर्थिक स्वातंत्र्य व उद्योजकतेला प्रोत्साहन देणे
- शिक्षण व कौशल्य विकासाद्वारे प्रगतीची संधी उपलब्ध करून देणे

३. अभियानाचे प्रमुख उद्दिष्टे :

* महिलांविषयी असलेली सामाजिक विषमता दूर करणे
* महिलांच्या हक्कांविषयी जनजागृती वाढविणे
* महिलांच्या आरोग्य, शिक्षण व पोषण स्थितीत सुधारणा करणे
* महिला स्वयंसहाय्यता गटांना बळकटी देणे
* महिला नेतृत्वाला प्रोत्साहन देणे
* डिजिटल साक्षरता व तंत्रज्ञानाचा वापर वाढविणे

**४. अभियानाचे प्रमुख घटक :**

**(अ) शैक्षणिक सक्षमीकरण :**

महिलांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देणे, शाळा सोडलेल्या मुलींना पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात आणणे तसेच उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहन देणे.

**(आ) आर्थिक सक्षमीकरण :**

महिलांना स्वयंरोजगार, सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांमध्ये संधी उपलब्ध करून देणे. स्वयं-सहाय्यता गट (डक्र्ह) यांच्या माध्यमातून बचत व गुंतवणूक संस्कृती विकसित करणे.

**(इ) आरोग्य व पोषण :**

गर्भवती व स्तनदा महिलांसाठी विशेष आरोग्य सेवा, पोषण आहार योजना तसेच नियमित आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करणे.

**(ई) सुरक्षा व कायदेशीर संरक्षण :**

महिलांविरुद्ध होणाऱ्या अत्याचारांना प्रतिबंध करण्यासाठी कठोर कायद्यांची अंमलबजावणी, हेल्पलाईन सेवा, तसेच पोलिस व न्यायव्यवस्थेतील संवेदनशीलता वाढविणे.

**(उ) सामाजिक सक्षमीकरण :**

लिंगभेद, बालविवाह, हुंडा प्रथा यांसारख्या सामाजिक कुप्रथांविरुद्ध जनजागृती करून महिलांना समान सन्मान मिळवून देणे.



**(ऊ) राजकीय सक्षमीकरण :**

स्थानिक स्वराज्य संस्था व इतर प्रशासकीय स्तरांवर महिलांचा सहभाग वाढविणे व नेतृत्वगुण विकसित करणे.

**५. अंमलबजावणी यंत्रणा :**

या अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी केंद्र व राज्य शासन, स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्था तसेच विविध विभागांमध्ये समन्वय साधला जातो. ग्रामस्तरापासून जिल्हास्तरापर्यंत विविध समित्या स्थापन करून कार्यक्रमांची अंमलबजावणी व देखरेख केली जाते.

**६. जनजागृती व सहभाग :**

अभियानाच्या यशस्वीतेसाठी जनसहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. यासाठी विविध माध्यमांद्वारे जनजागृती मोहीम राबविण्यात येतात. शाळा, महाविद्यालये, ग्रामसभा, महिला बचत गट यांच्यामार्फत महिलांना त्यांच्या हक्कांविषयी माहिती दिली जाते.

**७. अपेक्षित परिणाम :**

* महिलांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीत सुधारणा
* महिला साक्षरतेत वाढ
* रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधींमध्ये वाढ
* महिलांविरुद्ध होणाऱ्या गुन्ह्यांमध्ये घट
* निर्णय प्रक्रियेत महिलांचा वाढता सहभाग

**८. निष्कर्ष :**

नारी शक्ती वंदन अभियान हे महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी एक प्रभावी व दूरगामी परिणाम करणारे पाऊल आहे. या अभियानाच्या माध्यमातून महिलांना केवळ सन्मान मिळणार नाही तर त्यांना स्वतःच्या क्षमतांचा विकास करून समाजाच्या प्रगतीत सक्रिय योगदान देण्याची संधी मिळेल.

महिलांचे सक्षमीकरण हेच राष्ट्राच्या शाश्र्वत विकासाचे मूळ आहे, ही जाणीव ठेवून प्रत्येक घटकाने या अभियानात सक्रिय सहभाग नोंदविणे आवश्यक आहे.

**-श्रीकांत चंद्रकांत देशमुख**
**जिल्हा माहिती कार्यालय, हिंगोली**

## उमेद अभियानातून लातूरच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कायापालट

उमेद
क्षितिज नवे, विश्वास नवा...

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान म्हणजेच उमेद अभियानाद्वारे लातूर जिल्ह्यामध्ये सन २०१८ पासून ग्रामीण विकासाचे एक नवे पर्व सुरू झाले आहे. हे अभियान ग्रामीण भागातील गरीब, मागास, दिव्यांग, विधवा आणि अल्पभूधारक महिलांना स्वावलंबनाचा मार्ग दाखवणारी चळवळ बनली आहे. महिलांना सक्षम संस्थांच्या माध्यमातून संघटित करून त्यांच्या अंगभूत कौशल्यांचा विकास करणे आणि त्यांना शाश्वत उपजीविकेची साधने उपलब्ध करून देणे, हा या अभियानाचा मूळ गाभा आहे.

लातूर जिल्ह्याने उमेद अभियानात उल्लेखनीय कामगिर केली असून, आतापर्यंत १ लाख ९४ हजार ८९२ महिलांना २० हजार २५० स्वयंसहायता गटांच्या माध्यमातून अभियानाशी जोडण्यात आले आहे. या अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्ह्यात ९६३ ग्रामसंघ, ५८ प्रभागसंघ आणि १७६ उत्पादक गटांचे एक भक्कम जाळे निर्माण करण्यात आले आहे. यामाध्यमातून महिलांच्या आर्थिक उन्नतीचा पाया रचला जात आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या लखपती दीदी या महत्त्वाकांक्षी अभियानाची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी होत असून, महिलांना व्यवसाय निवडण्यापासून ते उत्पादनांच्या विपणनापर्यंत प्रत्येक टप्प्यावर प्रशिक्षण आणि भांडवलाची मदत दिली जात आहे.

लातूर जिल्ह्यातील महिला केवळ पारंपरिक कामांपुरत्या मर्यादित न राहता, आता आधुनिक शेती आणि उद्योगांकडे वळल्या आहेत. स्मार्ट प्रकल्प आणि केंद्र पुरस्कृत शेतकरी उत्पादक कंपनी निर्मितीच्या माध्यमातून सोयाबीन, तूर आणि हरभरा यांसारख्या पिकांच्या मूल्य साखळीवर आधारित व्यवसाय महिला यशस्वीपणे चालवत आहेत. डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत १२४ कृषी सखी नैसर्गिक शेतीचा प्रसार करत असून सेंद्रिय अन्नधान्य उत्पादनात मोलाचे योगदान देत आहेत. तसेच, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम आणि प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योगांतर्गत अनेक महिलांनी स्वतःचे उद्योग उभे करण्यासाठी बँकांच्या माध्यमातून यशस्वीपणे कर्जपुरवठा मिळवला आहे.

महिलांच्या आर्थिक सक्षमतेसाठी उमेद अंतर्गत विविध निधींचे वाटप करण्यात आले आहे. फिरता निधी, समुदाय गुंतवणूक निधी आणि जोखीम प्रवणता निधीच्या माध्यमातून गटांना आणि ग्रामसंघांना आर्थिक स्थैर्य प्रदान करण्यात आले आहे. सन २०२५-२६ या कालावधीत जिल्ह्यातील विविध गटांना २१५ कोटी ७५ लाख रुपयांचे बँक कर्ज उपलब्ध करून देण्यात आले आहे.

**महिला बचतगटांची उत्पादने ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मवर उपलब्ध**

लातूरच्या ग्रामीण महिलांनी तयार केलेली १०३ उत्पादने आता केवळ स्थानिक बाजारातच नव्हे, तर ॲमेझॉन, फ्लिपकार्ट, मिशो आणि ओ.एन.डी.सी. यांसारख्या ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मवर जगभरातील ग्राहकांसाठी उपलब्ध आहेत. लातूरची पारंपरिक गोधडी, शुद्ध मध, लाकडी बैलगाडी आणि दर्जेदार तूरडाळ या उत्पादनांनी ग्राहकांची मने जिंकली आहेत. जिल्ह्यातील उत्पादनांना हक्काची बाजारपेठ मिळवून देण्यासाठी आगामी दोन-तीन महिन्यांत हिरकणी मॉल कार्यान्वित होत असून, तो वर्षभर ग्राहकांसाठी खुला राहणार आहे. अशा प्रकारे, उमेद अभियानामुळे लातूर जिल्ह्यातील महिला केवळ घर चालवणाऱ्या गृहिणी न राहता, खऱ्या अर्थाने गावच्या अर्थव्यवस्थेचा कणा म्हणून उदयास येत आहेत.

– **संकलन : जिल्हा माहिती कार्यालय, लातूर**

## निलंगा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

**निलंगा/आयुब बागवान** : विश्वरत्न, भारतरत्न, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार आणि कोट्यवधींचे प्रेरणास्थान महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त निलंगा शहरासह संपूर्ण तालुका अभिमान, जल्लोष आणि कृतज्ञतेच्या भावनेने दुमदुमून गेला. ठिकठिकाणी ध्वजारोहण, अभिवादन, मिरवणुका, सामाजिक उपक्रम आणि आकर्षक देखाव्यांच्या माध्यमातून बाबासाहेबांना मानवंदना देण्यात आली.

पहाटेपासूनच शहरात जयभीमच्या घोषणांनी वातावरण भारावून गेले होते. निलंगा नगरपालिकेच्या वतीने नगराध्यक्ष संजयराज हलगरकर, मुख्याधिकारी, नगरसेवक, सामाजिक कार्यकर्ते, उपासक-उपासिका, आबालवृद्ध, महिला, युवक तसेच बालक-बालिकांच्या उपस्थितीत बाबासाहेबांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी नगरपालिकेतील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. निलंगा बसस्थानकातही जयंतीचा उत्साह ओसंडून वाहत होता. आगारप्रमुख अनिल बिडवे यांच्या उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर निलंगा आगारातील सर्व चालक, वाहक व कर्मचाऱ्यांनी बाबासाहेबांना वंदन केले. लाल परी बस आकर्षक सजवून भव्य जयंती सोहळा साजरा करण्यात आला. हा अनोखा देखावा नागरिकांचे विशेष आकर्षण ठरला.

तालुक्यातील तळीखेड येथे आम्रपाली बौद्ध विहार परिसरात सकाळी साडेनऊ वाजता सर्व बौद्ध उपासक-उपासिका तसेच विविध समाजघटकांच्या उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात आले. बाबासाहेबांच्या प्रतिमेस अभिवादन करून त्यांच्या महान कार्याचा गौरव करण्यात आला. उपस्थितांनी आपल्या मनोगतातून बाबासाहेबांचे विचार आजही समाजाला दिशा देणारे असल्याचे सांगितले. केळगाव येथेही जयंती विविध सामाजिक उपक्रमांनी साजरी करण्यात आली. गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करून अल्पोपहार देण्यात आला. या कार्यक्रमाला पत्रकार बालाजी कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. वंचित बहुजन आघाडीच्या संपर्क कार्यालयात डॉ. हिरालाल निंबाळकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी जिल्हाध्यक्षा मंजु निंबाळकर यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते. सायंकाळी शहरातील अशोकनगर, मिलिंदनगर, बौद्धनगर, आनंदनगर आदी भागांतील जयंती उत्सव मंडळांच्या वतीने डॉ. बाबासाहेबांच्या प्रतिमांच्या भव्य मिरवणुका काढण्यात आल्या. ढोल-ताशांचा गजर, जयभीमच्या घोषणा, निळ्या झेंड्यांची शान आणि आकर्षक देखावे यामुळे संपूर्ण शहर निळेमय झाले होते. अनेक ठिकाणी नागरिकांना नाश्ता, पाणी व अल्पोपहार वाटप करून सेवा उपक्रमही राबविण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्यायाच्या विचारांचा जागर निलंग्यात सर्वत्र दिसून आला. त्यांच्या जयंतीनिमित्त निलंग्याने पुन्हा एकदा बाबासाहेबांविषयीचा अपार आदर, प्रेम आणि निष्ठा जगासमोर दाखवून दिली.

# प्रतिष्ठेची निवडणूक




दक्षिणेतील राज्यांनी लोकसंख्येवर परिणामकारक रीतीने नियंत्रण ठेवले. अशावेळी केवळ लोकसंख्येच्या आधारावर लोकसभेच्या जागा वाढविण्याचा फायदा उत्तरेतील राज्यांना मिळणार, हे मान्य होण्यासारखे नाही.

पश्चिम बंगाल आणि तामिळनाडू विधानसभेसाठी गुरुवारी मतदान होत आहे. ही दोन्ही राज्ये तेथील सत्ताधार्यांप्रमाणे भाजपसाठी महत्त्वाची आहेत. विशेषतः पश्चिम बंगालची निवडणूक तर भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाने अतिशय प्रतिष्ठेची केली. लोकसभेत कोसळलेले महिला आरक्षण विधेयक आणि मतदारसंघ फेररचना विधेयक मांडण्यामागे दु-सरा कोणता हेतू होता? पश्चिम बंगालमध्ये महिला मुख्यमंत्री असूनही त्या महिला आरक्षणाला विरोध करतात, हा संदेश त्यातून देण्याचा प्रयत्न भाजपने केला. महिला आरक्षणाचा विषय निवडणुकीचा मुद्दा होऊ शकत नाही; पण अलीकडच्या काळात निवडणुकीला रणांगणाचे स्वरूप आणले गेले आहे आणि युद्धात सर्व क्षम्य, ही मानसिकता बळा-वली आहे! पश्चिम बंगालमध्ये विधानसभेच्या २९४ जागा आहेत. बहुमत गाठण्यासाठी १४८ जागांपर्यंत पोहोचावे लागेल. निवडणूक आयोगावर आजवर अनेक आरोप झाले. मात्र; पश्चिम बंगाल निवडणुकांबाबत आयोगाची भूमिका वादाची ठरली. मतदार याद्यांच्या सखोल पडताळणीची मोहीम, हा वादाचा केंद्रबिंदू ठरला. बांगला देशातील घुसखोरांना पश्चिम बंगालमध्ये मतदानाचा अधिकार देण्यात आला आहे, असा भाजपचा दावा आहे. या मुद्द्यावरून एवढे वादळ माजले, की सर्वोच्च न्यायालयात वारंवार अर्ज दाखल होत राहिले. पश्चिम बंगालमधील तृणमूल काँग्रेसचे सरकार विरुद्ध सर्वोच्च न्यायालय किंवा कोलकाता उच्च न्यायालय, असे टोकाचे चित्र निर्माण झालेले पाहायला मिळाले. ते अभूतपूर्व असेच म्हणता येईल.

ममतांचे भवितव्य पणाला

पडताळणी मोहिमेत वगळण्यात आलेल्या मतदारांपैकी अनेकांनी लवादाकडे दाद मागितली. लवादाने ज्यांचे अर्ज मान्य केले त्यांना मतदान करता येणार आहे. अशा मतदारांची नावे समाविष्ट असलेली पुरवणी मतदार यादी प्रकाशित करावी, असे आदेश न्यायालयाने निवडणूक आयोगाला नुकतेच दिले. म्हणजे, मतदानाची वेळ येऊन ठेपली तरी न्यायालयीन अर्ज, वाद, आव्हान- प्रतिआव्हान यात खंड पडलेला नाही. निवडणुकीनंतरही हा गोंधळ सुरूच राहील, असे दिसते. कथित घुसखोरांचा मुद्दा भाजपच्या प्रचाराच्या केंद्रस्थानी आला. 'ममता बॅनर्जी यांनी बंगाली नागरिकांच्या जमिनी बळकावून त्या घुसखोरांना दिल्या, यातून बंगालमधील लोकसंख्येची रचना बदलण्याचा प्रयत्न केला', असा आरोप भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबिन यांनी केला आहे. याला पूरक म्हणून उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांचा पक्षाच्या प्रचार मोहिमेत लक्षणीय सहभाग अपेक्षित होताच! भाजपचे तगडे आव्हान असताना देखील पश्चिम बंगालमधील विरोधकांना एकत्र येऊन निवडणूक लढविण्याचे शहाणपण दाखवता आले नाही, हे विशेष ! ममतांचे भवितव्य या निवडणुकीत पणाला लागले आहे हे निश्चित. तामिळनाडूत अभिनेता विजय यांचा तमिळगा वेत्तरी कळघम (टीव्हीके) हा पक्ष कमाल करून दाखविणार का? याबद्दल देशभर उत्सुकता आहे. दक्षिणेतील राज्यांची भाषिक विषयावरील संवेदनशीलता लक्षात घेऊन हिंदी सक्तीच्या मुद्द्यावर भाजपला लवचीकता दाखवता आली असती. 'हिंदीला तामिळनाडूत पूर्वीही स्थान नव्हते आणि भविष्यातही असणार नाही', अशा स्पष्ट शब्दांमध्ये मुख्यमंत्री एम.के. स्टॅलिन यांनी आपली ठाम भूमिका मांडली आहे. त्या आध-ारावर भाजपला रोखण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. लोकसभा निवडणुकीत स्टॅलिन यांच्या नेतृत्वाखाली द्रमुकने भरघोस यश मिळवले. त्यांचा प्रभाव कायम असल्याने अण्णा द्रमुक आणि भाजप किती मजल मारणार, हा प्रश्नच आहे. मतदारसंघ फेररचनेसाठी केंद्र सरकारने मांडलेल्या घटनादुरुस्ती विधेयकाला द्रमुकने विरोध केला. दक्षिणेतील राज्यांनी लोकसंख्येवर परिणामकारक रीतीने नियंत्रण ठेवले. अशावेळी केवळ लोकसंख्येच्या आधारावर लोकसभेच्या जागा वाढविण्याचा फायदा उत्तरेतील राज्यांना मिळणार, हे मान्य होण्यासारखे नाही. प्रचाराच्या शेवटच्या टप्प्यात तोही मुद्दा आला. दर पाच वर्षांनी तामिळनाडूत सत्तापालट होत असतो. यावेळी ही परंपरा कायम राहण्याची शक्यता कमी आहे.

# आरोग्य समस्यांसाठी उसाचा रस अमृतापेक्षा विषासारखाच

काही आरोग्य समस्यांसाठी उसाचा रस अमृतापेक्षा विषासारखाच ठरू शकतो. जर तुम्ही तो रोज पीत असाल, तर त्याचे गंभीर दुष्परिणाम जाणून घेणे महत्त्वाचे आहे.

**मधुमेही रुग्णांसाठी धोका**

उसाच्या रसात ग्लुकोज आणि सुक्रोजचे प्रमाण जास्त असते. त्याच्या उच्च ग्लायसेमिक लोडमुळे, त्याचे सेवन केल्यावर रक्तातील साखरेची पातळी अचानक वाढू शकते. मधुमेहींसाठी हे खूप धोकादायक ठरू शकते. साखरेच्या पातळीतील या वाढीमुळे लगेचच चिंता, चक्कर येणे आणि थकवा यांसारख्या समस्या उद्भवू शकतात.

वजन कमी करणे

जर तुम्ही फिटनेसप्रेमी असाल किंवा वजन कमी करण्याचा प्रयत्न करत असाल, तर उसाचा रस तुमचा सर्वात मोठा शत्रू ठरू शकतो. जरी ती एक नैसर्गिक साखर असली तरी, त्यात कॅलरीजचे प्रमाण खूप जास्त असते. अतिरिक्त कॅलरीज शरीरात चरबीच्या रूपात साठवल्या जातात. इतकेच नाही, तर साखरयुक्त पेये मेंदूला भुकेचे संकेत पाठवतात, ज्यामुळे अति खाणे आणि वेगाने वजन वाढणे घडते.-ङ्खज ठए-ऊ उन्हाळ्यात जास्त पाणी पिणे हे धोक्याचे लक्षण आहे, दुष्परिणाम जाणून घ्या मूत्रपिंड आणि यकृतावर दाब ज्यांना आधीपासूनच मूत्रपिंड किंवा यकृताचे गंभीर आजार आहेत, त्यांच्यासाठी उसाचा रस एक मोठे आव्हान ठरतो. अशा परिस्थितीत, शरीराची चयापचय क्रिया आधीच बिघडलेली असते. रसातील साखरेचे उच्च प्रमाण या अवयवांच्या कार्यावर अतिरिक्त ताण टाकते. यामुळे शरीरातील इलेक्ट्रोलाइट्सचे संतुलन बिघडू शकते आणि जुनाट आजार आणखी गुंतागुंतीचा होऊ शकतो.

अपचन आणि संसर्गाचा धोका

उन्हाळ्यात पचनसंस्था अनेकदा संवेदनशील बनते . उसाचा रस बहुतेकदा मोकळ्या जागेत काढला जातो, जिथे स्वच्छतेची कमतरता असते. घाणेरड्या हातांमुळे किंवा माश्यांमुळे त्यात सहजपणे जिवाणू वाढू शकतात. ज्या लोकांना पचनाचा त्रास आहे, त्यांना तो प्यायल्यानंतर पोटदुखी, गॅस, पोट फुगणे आणि अतिसाराचा त्रास होऊ शकतो.उसाचा रस ताजेतव-ाने करणारा असतो, पण तो पिण्यापूर्वी आपल्या आरोग्याची स्थिती समजून घेणे महत्त्वाचे आहे.



तुम्ही निरोगी असलात तरी, तो प्रमाणात आणि स्वच्छ स्रोतातूनच प्यावा. तथापि, जर तुम्हाला वर नमूद केलेल्या आजारांपैकी कोणताही आजार असेल, तर लिंबाचे पाणी किंवा नारळाच्या पाण्यासारखे सुरक्षित पर्याय निवडा.अस्वीकरण: वेबदुनियावर औषध, आरोग्य टिप्स, योग, धर्म, ज्योतिष, इतिहास, पौराणिक कथा इत्यादी विषयांवर प्रकाशित/प्रसारित होणारे व्हिडिओ, लेख आणि बातम्या केवळ तुमच्या माहितीसाठी आहेत आणि विविध स्रोतांकडून घेतल्या आहेत. वेबदुनिया याच्या सत्यतेची पुष्टी करत नाही. आरोग्य किंवा ज्योतिषाशी संबंधित कोणताही प्रयोग करण्यापूर्वी नेहमीच तज्ञांचा सल्ला घ्या. ही सामग्री सार्वजनिक हितासाठी सादर केली गेली आहे आणि कोणत्याही वैज्ञानिक पुराव्यांद्वारे समर्थित नाही.

# संत तुकाराम

संत तुकाराम महाराजांनी जीवनातील खर्या स्वातंत्र्याचा मार्ग दाखवला आहे. हे स्वातंत्र्य बाह्य बंधनांपासून मुक्त होण्यात नसून; अंतर्मनातील आसक्ती आणि भीती यांवर विजय मिळवण्यात आहे. जेव्हा माणूस समाजाच्या अपेक्षा, निंदा किंवा कौतुक यांपलीकडे जाऊन आपल्या अंत:करणातील सत्याशी प्रामाणिक राहतो; तेव्हा त्याला एक विलक्षण शांतता आणि समाधान प्राप्त होते.आजच्या युगात हा संदेश अधिकच महत्त्वाचा ठरतो. कारण आधुनिक जीवनात माणूस सतत बाह्य जगाच्या प्रभावाखाली असतो. समाज माध्यमावरील प्रतिक्रिया, समाजातील प्रतिमा आणि स्पर्धेचा दबाव यामुळे मन अस्थिर होते. अशा वेळी संत तुकाराम महाराजांचा हा विचार मार्गदर्शक ठरतो. ते सांगतात की, खरे समाधान बाह्य मान्यतेत नसून अंतर्मनातील स्थिर श्रद्धेत आहे. जेव्हा माणूस आपल्या चित्ताला अनंताशी जोडतो; तेव्हा त्याच्या जीवनातील भीती, चिंता आणि अस्थिरता आपोआप कमी होतात. संत तुकाराम महाराजांची अभंगवाणी ही केवळ काव्यसंपदा नसून ती जीवनाला दिशा देणारा दीपस्तंभ आहे. त्यांच्या विचारांमध्ये मानवी जीवनातील दुःख, संघर्ष आणि समाधान यांचा समतोल साधलेला आहे. त्यांनी दाखवलेला मार्ग हा प्रत्येकासाठी खुला आहे. फक्त त्या मार्गावर चालण्यासाठी अंतर्मनातील प्रामाणिकता आणि श्रद्धा आवश्यक आहे. जेव्हा माणूस या मार्गावर चालतो; तेव्हा त्याला खर्या अर्थाने स्वातंत्र्य, शांतता आणि आत्मिक आनंद अनुभवता येतो. संत तुकाराम महाराजांचा हा संदेश आजही तितकाच जिवंत आणि प्रेरणादायी आहे.सामाजिक दृष्टिकोनातून पाहिले तर या अभंगांमध्ये समतेचा आणि स्वातंत्र्याचा संदेश आहे. जात, कुल, आ-चार यांसारख्या गोष्टींमध्ये अडकून न राहता माणसाने व्यापक दृष्टिकोन स्वीकारावा; हे तुकाराम महाराज सुचवतात. त्यांनी दाखवले की समाजात राहूनही माणूस अंतर्मनात स्वतंत्र राहू शकतो. त्यासाठी आत्मचिंतनाची वृत्ती आणि परमेश्वरावर असलेली अढळ श्रद्धा आवश्यक आहे.

# उपदेशकथा: तिसरा फटका



काही कामासाठी गावातील शाळेच्या मुख्याध्यापकांना भेटायला गेलो होतो. त्यांच्याशी बोलत असताना एक शिक्षक काही मुलांविरुद्ध तक्रार घेऊन आले. मुख्याध्यापकांनी त्यांची तक्रार ऐकून घेतली. मुलांना आत बोलावले. टेबलाखालून छडी काढली आणि एकेका मुलाच्या हातावर दोन-दोन छड्या मारल्या. शेवटचा मुलगा दोन छड्यानंतर जायला वळला. मुख्याध्यापक म्हणाले, थांब तो थांबला. छडी पुन्हा वर गेली. तिसरा फटका आता जा, ते कठोरपणे म्हणाले. मुलगा निघून गेला. थोड्याच वेळात मी बाहेर पडलो, पायर्यांजवळ योगायोगाने मला तोच मुलगा दिसला. नकळत माझी उत्सुकता प्रकट झाली. त्याला थांबवून मी विचारले, काय रे, मुख्याध्यापकांनी तुला एक छडी अधिक का मारली? ते माझे वडील आहेत, मुलाने उत्तर दिले. काय केले हो-तेस? मला राहवेना. खरं तर मी काहीच केलं नव्हतं. पण शिक्षकांना कसं पटवून देणारं? मग शिस्तीसाठी खाल्ल्या छड्या मी म्हणालो, आता घरी गेल्यावर? घरी यातलं काहीही राहणार नाही कारण मी काही गैर केलं नाही हे बाबांना नक्कीच माहीत आहे. तेवढा विश्वास मी कमवला आहे. मी तसं उत्तर देऊ शकलो असतो पण त्यांची शिस्त मोडणं म्हणजे त्यांचा अपमान झाला असता. आमचा दोघांचाही एकमेकांवर गाढा विश्वास आहे. मुलाचे बोलणे ऐकून मला त्याचा अभिमान वाटला.

**कथा उपदेश**

आई-वडिलांच्या शिस्तीचा आदर करा.

## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा



सहवास शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवतो, ज्यामुळे तुम्ही कमीत कमी वेळ आजारपणाचा सामना करतात.. पुरुषांच्या लैंगिक प्रतिसादात लैंगिक उत्तेजना, शिश्नाची ताठरता व वीर्यस्खलन या प्रक्रिया होतात. स्खलन झाल्यानंतर ताठरता कमी होत-होत नष्ट होते. शीघ्रपतनावर उपचार करताना या लैंगिक प्रतिसादावर विशेष लक्ष द्यावं लागतं.डॉक्टर लग्नाला दोन महिने झाले, पण शारीरिक संबंधात मी फारच कमी पडतो. मला तिचं समाधान करता येत नाही.

## २ Joke — विनोद




महागाईने वैतागलेल्या चिंतोपंताकडे एका अनाथाश्रमाचे व्यवस्थापक वर्गणी मागायला गेले व म्हणाले आपण आमच्या अनाथाश्रमाला काही ना काहीतरी अवश्य द्यायला हवे. ङ्गहो. हो का नाहीफ चिंतोपंत म्हणाले, ङ्गमाझी चारही पोरं घेऊन जा.

## ३ Message — संदेश




Har mod ka mukam nhi hota,
dil ke risto ka koi naam nhi hota,
DISCOVERY ki help se khoja hai aapko
warna aap jaise prajati ka milna aasan nhi hota

## ४ Thought — सुविचार




घाम गाळल्याशिवाय दामाची खरी किंमत कळत नाही.

**संस्कृत सुभाषित**

**यत्र विद्वज्जनो नास्ति श्‍लाघ्यस्तत्राल्पधीरपि।**
**निरस्तपादपे देशे एरण्डोऽपि द्रुमायते ॥**

अर्थ - जिथे विद्वानांचा अभाव असेल तेथे अल्पमती स्तुत्य ठरतो, जिथे झाडे नसतात, तिथे एरंड वृक्षपदाला पोचतो.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. मृत्यूवर विजय मिळविणारा
४. फायदेशीर, हितावह
७. अवाजवी
१०. संगीतातील एक राग
१२. संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेली प्रार्थना
१४. मला
१५. रसाने भरलेले, उदा.वर्णन
१८. लबाडीचा हेतू
१९. राबता, जाणे-येणे
२१. मऊ
२२. सद्वर्तन
२३. पळसाच्या पानांची संख्या
२४. बेकरीतील एक पदार्थ
२५. लेखणी
२७. उद्याच्या नंतरचा दिवस
२८. नेभळट मनुष्य
३०. प्रत्येकाला त्याच्या कल्पनेनुसार परमेश्वर प्रतीत होतो या अर्थाची उक्ती. '-- -- -- देव!'
३२. एक चर्मवाद्य
३३. वांग्याचा खमंग पदार्थ
३४. तलमसुती कापड
३६. हिंमत, धैर्य
३८. गावातील गप्पाष्टकाची जागा
३९. छोटी बैलगाडी
४१. जन्म
४२. चिनीमातीची वाटी
४२अ. घरटे (संस्कृत)
४४. पत्नी
४५. फणसातील खाद्यभाग
४६. च्या शिवाय
४८. दरवाजा
४९. चंद्र
५०. तबकातील या शूभ्र पदार्थाने वाता-वरणशुद्धी होते
५१. रामचरित मानस लिहिणारे रामभक्त संत
५४. समाचार
५५. भांडण
५६. नमस्कार
५७. नवे कोरे
५९. कमळ
६१. बासरी
६२. कोलकाताचे विमानतळ
६४. व्रत
६७. टाळ्यांचा आवाज
६८. हिंदीत पाऊल, मराठीतले एक आडनाव
६९. प्रज्वलित, तापलेले

### उभे शब्द

१. हरिण, एक नक्षत्र
२. महाभारताचे मूळ नाव
३. मृत्यूदेवता
५. लवकर, वेगाने
६. बशीचा जोडीदार
७. अभिनेता
८. चणचण
९. अखबार
११. पुरुष
१३. चाणक्यनीती
१४. वर्षाचा बारवा भाग
१६. एक मंगलवाद्य
१७. वीस दस्ते कागद
१९अ. संक्रांतीचे दान
२०. रोखलेली नजर
२२. मनाला टोचणारे दु:ख
२५. व्यायाम, परेड
२६. शाकंभरी पौर्णिमेचा मराठी महिना
२७. पुन्हापुन्हा
२८. माळेतील मधला मोठा मणी
२९. दिल्लीचे विमानतळ
३१. निषिद्ध, त्यागलेले
३५. नव्वद अंशाच्या आतील कोन
३६. महासर्प
३७. सिंहाची उपाधी
३८. बसण्याची फळी
४०. झकास, छान
४२. अनाथच्या विरुद्ध
४३. धडक
४४. पोते
४६. गणपतीचे एक नाव
४७. असामान्य, तुलना करता येणार नाही असा
४८. राजा-राणीची सेविका
५२. लाट, झटका, हुक्की
५३. एकूण एक सर्व
५४. कडक व चिवट
५७. दरवाजा
५८. नरमच्या विरुद्ध
६०. एक गळीत धान्य
६१. पवित्र
६३. हत्तीच्या गंडस्थळातील स्राव
६५. तात्पर्य
६६. दु:ख, हळहळ

### आडवे उत्तर

१.मृत्युंजय ४.लाभदायक ७.अवास्तव १०.यमन १२.पसायदान १४.मज १५.रसभरीत १८.कावा १९.वहिवाट २१.नरम २२.सदाचार २३.तीन २४.नानकटाई २५.कलम २७.परवा २८.मेषपात्र ३०.जसा भाव तसा ३२.डमरु ३३.भरीत ३४.मलमल ३६.अवसान ३८.पार ३९.दमणी ४१.जनन ४२.सट ४२अ.कोटर ४४.बायको ४५.गरा ४६.विना ४८.दार ४९.रजनीनाथ ५०.कापूर ५१.तुलसीदास ५४.वार्ता ५५.कलह ५६.नमन ५७.करकरीत ५९.नीरज ६१.पावा ६२.डमडम ६४.वसा ६७.कडकडाट ६८.कदम ६९.रसरशीत

### उभे उत्तर

१.मृग २.जय ३.यम ५.भरभर ६.कप ७.अदाकार ८.वानवा ९.वर्तमानपत्र ११.नर १३.साम दाम दंड भेद १४.महिना १६.सनई १७.रीम १९अ.वानवसा २०.टक २२.सल २५.कवायत २६.पौष २७.परतपरत २८.मेरुमणी २९.पालम ३१.वर्ज्य ३५.लघुकोन ३६.अजगर ३७.वनराज ३८.पाट ४०.मस्त ४२.सनाथ ४३.टक्कर ४४.बारदान ४६.विनायक ४७.अतुलनीय ४८.दासी ५२.लहर ५३.समस्त ५४.वातड ५७.कवाड ५८.कडक ६०.जवस ६१.पाक ६३.मद ६५.सार ६६.खंत



# क्रीडा विश्व

## थोडक्यात/ संक्षिप्त

### तिलक वर्माच्या शानदार शतकाच्या जोरावर मुंबई इंडियन्सचा विजय

**अहमदाबाद** –तिलक वर्माची स्फोटक फलंदाजी आणि अश्विनी कुमारच्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर मुंबई इंडियन्सने गुजरात टायटन्सवर ९९ धावांनी विजय मिळवला. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर नाणेफेक गमावल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना, तिलकच्या नाबाद १०१ धावांच्या जोरावर मुंबईने २० षटकांत पाच विकेट्स गमावून १९९ धावा केल्या. गुजरातचा संघ १५.५ षटकांत केवळ १०० धावाच करू शकला आणि सर्वबाद झाला. धावांच्या फरकाने मिळवलेला हा मुंबईचा आयपीएलमधील चौथा सर्वात मोठा विजय आहे. तसेच, गुजरातचा संघ आपल्या सर्वात कमी धावसंख्येवर सर्वबाद होण्याची ही दुसरी वेळ होती.. सलग चार पराभवांनंतर मुंबईचा हा पहिला विजय आहे. या हंगामातील दुसऱ्या विजयासह, हार्दिक पांड्याच्या नेतृत्वाखालील संघाने चार गुणांसह गुणतालिकेत सातव्या स्थानावर झेप घेतली आहे. त्यांचा नेट रन रेट देखील सुधारून +०.०६७ झाला आहे. गुजरात सध्या सहा गुणांसह सहाव्या स्थानावर आहे.गुजरातची सामन्याची सुरुवात खराब झाली होती. डावाच्या पहिल्याच चेंडूवर संघाने साई सुदर्शनला (०) गमावले. पुढच्याच षटकात, जोस बटलरच्या (५) रूपाने त्यांना दुसरा धक्का बसला. त्यानंतर, वॉशिंग्टन सुंदर आणि शुभमन गिल यांनी २० चेंडूंमध्ये तिसऱ्या विकेटसाठी ३५ धावा जोडल्या.

### एमआय विरोधात गुजरातचा अख्खा संघ १०० धावांवर बाद; तरीही शुभमनने गोलंदाजांना धरले जबाबदार

**मुंबई,**–गुजरात क्रिकेट संघाचा कर्णधार शुभमन गिलने मुंबई इंडियन्सविरोधातील पराभवासाठी संघाच्या गोलंदाजांना जबाबदार धरलं आहे. सोमवारी झालेल्या सामन्यात मुंबई इंडियन्सने गुजरातचा ९९ धावांनी पराभव केला. रबाडाने पॉवरप्लेमध्ये ३ विकेट घेतलेल्या असताना मुंबई संघाने १९९ धावसंख्या उभारली. तिलक वर्माने केलेल्या जबरदस्त फटकेबाजी आणि शतकाच्या जोरावर मुंबईला इतकी धावसंख्या उभारता आली. सामन्यानंतर बोलताना शुभमन गिलने कबूल केले की, खेळपट्टी थोडी धीमी आणि संथ असतानाही मुंबईला मोठी धावसंख्या उभारण्यापासून रोखण्यास आम्हाला अपयश आले. खरे सांगायचे तर, मला वाटते आम्ही मधल्या ओव्हर्समध्ये अनेक धावा दिल्या. मला वाटते अशा खेळपट्टीवर १६० ते १७० इतकी धावसंख्या ठीक आहे. आम्हाला या सामन्यातून बरंच काही शिकायला मिळाले आहे,फ्र असे शुभमन गिलने म्हटले आहे. पराभव झाला असला तरी या पराभवातून आमच्या संघाला बरंच काही शिकायला मिळालं आहे, ज्याची स्पर्धेतील पुढील सामन्यांमध्ये मदत होईल अशी अपेक्षा शुभमन गिलने व्यक्त केली आहे. दरम्यान मुंबईने गुजरातचा केलेला हा आतापर्यंतचा सर्वात मोठा पराभव ठरला आहे. याआधी २०२५ मध्ये चेन्नईने गुजरातचा ८३ धावांनी पराभव केला होता.

### क्रीडा आणि सांस्कृतिक स्पर्धांमधून कामगारांना नावलौकिक कमविण्याची संधी -कामगार मंत्री

मुंबई,–कामगार कल्याण मंडळाच्या माध्यमातून कामगारांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतो. या प्रयत्नांचाच भाग म्हणून या राज्यस्तरीय कबड्डी क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. कामगार कल्याण मंडळाच्यावतीने आयोजित अशा स्पर्धा कामगार व त्यांचे पाल्य, कुटुंबीय यांना नावलौकिक कमविण्याची संधी आहे, असे प्रतिपादन कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी केले.हुतात्मा बाबू गेनू मुंबई कामगार क्रीडा भवन येथे औद्योगिक व व्यावसायिक कामगारांच्या २९ व्या आणि महिलांच्या २४ व्या खुल्या राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन कामगार मंत्री फुंडकर यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाला व्यासपीठावर कामगार राज्यमंत्री आशिष जयस्वाल, आमदार कालिदास कोळंबकर, आमदार मनिषा कायंदे, आमदार सुनील शिंदे, असंघटित कामगार विकास आयुक्त सुशील खोडवेकर, कामगार आयुक्त एच पी तुम्मोड, उपसचिव रोशनी कदम, सुरक्षा मंडळाचे अध्यक्ष डोके, कामगार कल्याण मंडळाच्या माजी सदस्य भाग्यश्री भुर्के, मुंबई शहर कबड्डी असोसिएशनचे सरचिटणीस विश्वास मोरे, छत्रपती शिवाजी महाराज पुरस्कार प्राप्त रामचंद्र जाधव आदी उपस्थित होते.

## अभिषेकचं वादळी शतक; मलिंगा-हर्षची मोलाची साथ

नवी मुंबई: सनरायझर्स हैदराबाद आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात झालेल्या सामन्यात हैदराबादने ४७ धावांनी विजय मिळवला.

आयपीएल २०२६ स्पर्धेतील ३१ वा सामना सनरायझर्स हैदराबाद आणि दिल्ली कॅपिटल्स या दोन्ही संघांमध्ये पार पडला. या सामन्यात दिल्लीने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. प्रथम फलंदाजी करताना हैदराबादकडून अभिषेक शर्माने तुफानी शतकी खेळी केली. त्याला शेवटी हेनरिक क्लासेनची चांगली साथ मिळाली. हैदराबादने प्रथम फलंदाजी करताना २ गडी बाद २४२ धावांचा डोंगर उभारला होता. या धावांचा बचाव करताना हैदराबादच्या गोलंदाजांनीही दमदार गोलंदाजी केली. इशान मलिंगाने सर्वाधिक ४ गडी बाद केले. दिल्लीचा संघ विज्यापासून ४७ धावा दूर राहिला. दिल्ली कॅपिटल्सला हा सामना जिंकण्यासाठी २४३ धावा करायच्या होत्या. सलामीला आलेला पथूम



निसांका अवघ्या ८ धावांवर माघारी परतला. केएल राहुलने डाव सांभाळण्याचा प्रयत्न केला. पण साकिब हुसेनने त्याला ३७ धावांवर माघारी धाडलं. गोलंदाजीत फ्लॉप ठरलेल्या नितीश राणाने फलंदाजीत कसर काढली. त्याने ५७ धावांचे योगदान दिले. गेल्या सामन्यातील हिरो डेव्हिड मिलर या सामन्यात शून्यावर माघारी परतला. ट्रिस्टन स्टब्सने २७ धावा केल्या. तर इम्पॅक्ट प्लेअर म्हणून फलंदाजीला आलेला आशुतोष शर्मा अवघ्या १४ धावांवर बाद झाला. दिल्लीकडून समीर रिझवीने ४१ धावांची खाकी केली. हैदराबादला २० षटकांअखेर९ गडी बाद १९५ धावा करता आल्या.

हैदराबादने उभारला २४२ धावांचा डोंगर या सामन्यात सनरायझर्स हैदराबादचा संघ नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करण्यासाठी आला होता. हैदराबादकडून ट्रॅव्हिस हेड आणि अभिषेक शर्माची जोडी मैदानावर आली. दोघांनी मिळून दमदार सुरुवात केली. पहिल्या विकेटसाठी दोघांनी ९७ धावा जोडल्या. यादरम्यान हेड ३७ धावा करून माघारी परतला. त्यानंतर फलंदाजीसाठी आलेल्या इशान किशनने १३ चेंडूत ताबडतोड २५ धावांची खेळी केली. शेवटी अभिषेक शर्मा आणि हेनरिक क्लासेनने मिळून दिल्लीच्या गोलंदाजांची चांगलीच धुलाई केली. ही जोडी शेवटपर्यंत उभी राहिली आणि संघाची धावसंख्या २ गडी बाद २४२ धावांपर्यंत पोहोचवली. अभिषेक शर्माने ४७ चेंडूत आपलं शतक पूर्ण केलं. त्याने ६८ चेंडूत नाबाद १३५ धावांची खेळी केली. तर हेनरिक क्लासेनने अवघ्या १३ चेंडूत ३७ धावा केल्या.

## फुटबॉल संघ कतारविरुद्ध २ मैत्रीपूर्ण सामने होणार

नवी दिल्ली : आगामी एएफसी अंडर-१७ आशियाई चषक स्पर्धेच्या तयारीचा भाग म्हणून भारताचा १७ वर्षांखालील पुरुष फुटबॉल संघ कतारविरुद्ध दोन आंतरराष्ट्रीय मैत्रीपूर्ण सामने खेळणार आहे. अखिल भारतीय फुटबॉल महासंघाने (एआयएफएफ) सोमवारी याची घोषणा केली. हे सामने २५ आणि २८ एप्रिल रोजी दोहा येथे खेळले जाणार असून, ते प्रेक्षकांविना (रिकाम्या स्टेडियममध्ये) पार पडतील. या सामन्यांद्वारे भारतीय संघाला मोठ्या स्पर्धेपूर्वी आपली रणनीती आणि संघरचना तपासण्याची संधी मिळणार आहे.

सध्या भारतीय संघ थायलंडमध्ये सराव आणि मैत्रीपूर्ण सामन्यांमध्ये व्यस्त आहे. संयुक्त अरब अमिरातीविरुद्धच्या पहिल्या सामन्यात भारताने १-० असा विजय मिळवला आहे. दुसरा सामना खेळल्यानंतर प्रशिक्षक बिबियानो फर्नांडिस यांच्या



मार्गदर्शनाखालील संघ २२ एप्रिल रोजी दोहासाठी रवाना होईल. दोहा येथील सामने संपल्यानंतर संघ ३० एप्रिल रोजी सौदी अरेबियातील जेद्दाह येथे पोहचेल, जिथे एएफसी अंडर-१७ आशियाई चषक स्पर्धा होणार आहे.या स्पर्धेत भारत गट 'ड' मध्ये असून त्यांचा पहिला सामना ६ मे रोजी ऑस्ट्रेलियाविरुद्ध, दुसरा १० मे रोजी उझबेकिस्तानविरुद्ध आणि तिसरा १३ मे रोजी उत्तर कोरियाविरुद्ध होणार आहे.भारताचा २४ सदस्यीय संभाव्य संघ कतार दौर्यावर जाणार असून, अंतिम २३ सदस्यीय संघ स्पर्धेपूर्वी जाहीर केला जाणार आहे.

## माजी वेगवान गोलंदाज शापूर झद्रान गंभीर आजाराने रुग्णालयात

**नवी दिल्ली :** अफगाणिस्तानचा माजी वेगवान गोलंदाज शापूर झद्रान सध्या जीवघेण्या आजाराशी झुंज देत असून त्याला नवी दिल्लीतील रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले आहे. ३८ वर्षीय डावखुरा गोलंदाज हिमोफॅगोसायटिक लिम्फोहिस्टिओसायटोसिस या दुर्मिळ आजाराने ग्रस्त आहे.हा आजार प्रामुख्याने रोगप्रतिकारक शक्तीवर परिणाम करतो. शरीरातील प्रतिकारशक्ती अतिसक्रिय होऊन तीव्र दाह निर्माण करते, ज्यामुळे अस्थिमज्जा, यकृत, प्लीहा आणि लिम्फ नोड्ससारख्या अवयवांवर गंभीर परिणाम होऊ शकतो. झद्रान यांना गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये प्रथम अस्वस्थता जाणवली होती. त्यानंतर अफगाणिस्तानातील डॉक्टरांनी त्यांना पुढील उपचारांसाठी भारतात येण्याचा सल्ला दिला. झद्रान यांच्या शरीरात क्षयरोगाचा संसर्गही आढळला होता आणि तो मेंदूपर्यंत पसरल्याचे एमआरआय आणि सीटी स्कॅनमध्ये स्पष्ट झाले.

## सूर्यकुमानंतर कोण होणार टी-२० संघाचा कर्णधार? हे आहेत प्रबळ दावेदार

नवी मुंबईः सूर्यकुमार यादव सध्या भारतीय टी-२० संघाचा कर्णधार आहे. जर सूर्याला कर्णधारपदावरून काढलं, त्याच्या जागी कोणाला संधी मिळू शकते?

भारतीय संघाने सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली खेळताना २०२६ टी -२० वर्ल्डकप स्पर्धेत जेतेपदाचा मान पटकावला होता. संपूर्ण संघाने दमदार कामगिरी केली, सूर्यकुमार यादवने कर्णधार म्हणून उत्तम निर्णय घेतले. पण फलंदाजीत तो स्वतःला सिद्ध करू शकला नव्हता. एकही सामन्यात तो मोठी खेळी करू शकला नव्हता. त्यानंतर आता आयपीएल २०२६ स्पर्धेतही त्याची बॅट शांतच आहे. मिस्टर ३६० म्हणून ओळखला जाणारा सूर्यकुमार यादव मधल्या फळीत येऊन मोठे फटके खेळण्यासाठी ओळखला जातो. त्यामुळे त्याच्या संघातील स्थानावर आता प्रश्न उपस्थित केला जाऊ लागला आहे. दरम्यान जर सूर्यकुमार यादवला कर्णधारपदावरून काढलं, तर त्याची जागा कोण घेणार?

सूर्यकुमार यादवने कर्णधार म्हणून चांगले निर्णय घेतले आहेत. पण फलंदाजीत तो सातत्याने फ्लॉप ठरत आहे. त्यामुळे त्याचं संघातील स्थान धोक्यात आहे. जर तो खराब फॉर्ममुळे आयपीएलमधून बाहेर पडला, तर त्याच्या जागी श्रेयस अय्यर हा कर्णधारपदासाठी प्रबळ दावेदार आहे.

यासह इशान किशन आणि शुबमन गिल देखील कर्णधारपदाच्या शर्यतीत आहेत. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाला १८ वर्षानंतर पहिली ट्रॉफी जिंकून देणाऱ्या रजत पाटीदारने कर्णधार म्हणून दमदार कामगिरी केली आहे. पण त्याला आतापर्यंत टी -२० संघासाठी पदार्पण करण्याची संधी मिळालेली नाही. शुबमन गिल सध्या कसोटी आणि वनडे संघाचा कर्णधार आहे. टी -२० वर्ल्डकपसाठी निवडलेल्या संघात गिलला संघात स्थान मिळणार अशी चर्चा होती, पण त्याला संघाबाहेर करण्यात आलं होतं. त्याच्या जागी इशान किशनचा संघात समावेश करण्यात आला होता. आता आयपीएलच्या गेल्या काही हंगामांमध्ये श्रेयस अय्यरने कर्णधार आणि फलंदाज म्हणून स्वतःला सिद्ध केलं आहे. तसेच श्रेयस अय्यरकडे अनुभव देखील आहे. त्यामुळे कर्णधार बनण्याच्या शर्यतीत श्रेयस अय्यर सर्वात पुढे आहे. आता बीसीसीआय सूर्यकुमार यादवच्या बाबतीत काय निर्णय घेणार हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे.रोहित शर्माने टी -२० संघाचं कर्णधारपद सोडल्यानंतर ही जबाबदारी सूर्यकुमार यादवकडे सोपवण्यात आली होती. सूर्याने २०२६ पर्यंत कर्णधार म्हणून ५२ सामने खेळले आहेत. यापैकी ४० सामने जिंकले आहेत.

तर केवळ ८ सामन्यांमध्ये पराभवाचा सामना करावा लागला आहे. यादरम्यान २ सामने अनिर्णित राहिले आहेत.

## टीम मुंबईची स्ट्रॅटेजी १२ तासातच चेंज झाली..

मुंबई-आयपीएल २०२६ मध्ये लागोपाठ ४ मॅच गमावल्यानंतर मुंबई इंडियन्स अखेर विजयाच्या ट्रॅकवर आली आहे. सोमवारी मुंबईने गुजरात टायटन्सचा ९९ रननी पराभव केला. या दणदणीत विजयाच्या २४ तासांमध्येच मुंबईला आणखी एक गुड न्यूज मिळाली आहे. टीमचा स्टार ऑलराऊंडर विल जॅक्स मुंबईच्या टीममध्ये दाखल झाला आहे. आयपीएलमध्ये मुंबईचा पुढचा सामना चेन्नई सुपरकिंग्सविरुद्ध गुरूवारी होणार आहे. या सामन्याआधी विल जॅक्स वानखेडे स्टेडियमवर मुंबईच्या खेळाडूंसोबत सराव करताना दिसल्याचं वृत्त क्रिकबझने दिलं आहे.

मुंबईच्या टीममध्ये होणार बदल

विल जॅक्सचं आगमन मुंबई इंडियन्ससाठी दिलासादायक आहे. विल जॅक्सला मुंबई ओपनिंगला किंवा मिडल ऑर्डरमध्येही बॅटिंगला पाठवू शकते, तसंच त्याच्या स्पिन बॉलिंगचा फायदाही मुंबईला होऊ शकतो. विल जॅक्स टीममध्ये आल्यामुळे मुंबईची बॅटिंग आणि बॉलिंगही मजबूत होणार आहे. मुंबईकडे सध्या अल्लाह गझनफर आणि मिचेल सॅन्टनर हे दोन स्पिन बॉलर आहेत, पण विल जॅक्स टीममध्ये आला तर या दोघांपैकी एकाला टीमबाहेर जावं लागू शकतं.

### टीममध्ये आला सगळ्यात मोठा मॅच विनर!



२७ वर्षांचा विल जॅक्स मुंबई इंडियन्सना ओपनिंगला पर्यायही देतो. गुजरातविरुद्धच्या सामन्यात क्विंटन डिकॉकसोबत दानिश मालेवार याने त्याचं आयपीएल पदार्पण केलं, पण त्याला मोठा स्कोअर करता आला नाही. सीएसकेविरुद्ध मुंबई विल जॅक्सला ओपनिंगला किंवा मिडल ऑर्डरमध्ये खेळवण्याची शक्यता आहे.

भारतामध्ये झालेल्या टी-२० वर्ल्ड कपमध्ये विल जॅक्सने इंग्लंडसाठी उत्कृष्ट कामगिरी केली होती. वर्ल्ड कपच्या ४ सामन्यांमध्ये जॅक्सला प्लेअर ऑफ द पुरस्कार मिळाला होता. मुंबई इंडियन्सची टीम आणि चाहते मागच्या बऱ्याच काळापासून जॅक्सच्या आगमनाची वाट पाहत होते. मुंबई इंडियन्सची ही प्रतिक्षा आता संपली आहे. जॅक्सच्या आगमनामुळे मुंबईचं नशीबही बदलेल, अशी आशा टीम आणि चाहत्यांना आहे.आयपीएलच्या या मोसमात मुंबईने केकेआरविरुद्धचा पहिला सामना जिंकला, त्यानंतर मात्र दिल्ली, राजस्थान, आरसीबी आणि पंजाबविरुद्ध मुंबईला लागोपाठ ४ पराभव पत्करावे लागले. यानंतर सोमवारी गुजरातविरुद्धच्या सामन्यात मुंबईचा विजय झाला. आयपीएलच्या ६ सामन्यानंतर मुंबईचे २ विजय आणि ४ पराभव आहेत. पॉईंट्स टेबलमध्ये मुंबई ४ पॉईंट्ससह सातव्या क्रमांकावर आहे. मुंबईचा पुढचा सामना गुरूवारी २३ एप्रिलला चेन्नई सुपरकिंग्सविरुद्ध वानखेडे स्टेडियमवर होणार आहे.

## जेएम ईगल एलए चॅम्पियनशिपमध्ये अदिती अशोक ५१व्या स्थानावर

**लॉस एंजेलिस :** भारतीय स्टार गोल्फपटू अदिती अशोक हिला जेएम ईगल एलए चॅम्पियनशिपमध्ये अपेक्षित कामगिरी करता आली नाही. अंतिम फेरीत चार-ओव्हर ७६ असा स्कोअर करत तिने स्पर्धा संयुक्त ५१व्या स्थानावर समाप्त केली.अदितीने सुरुवातीला सावध खेळ केला, मात्र अंतिम फेरीत तिला लय सापडली नाही. तिने एक बर्डी नोंदवली असली तरी दोन बोगी आणि एक ट्रिपल बोगीमुळे तिचा एकूण स्कोअर बिघडला. परिणामी ती क्रमवारीत मागे सरकली. स्पर्धेच्या आधीच्या फेर्यांमध्ये तिने स्थिर कामगिरी केली होती, पण निर्णायक टप्प्यावर सातत्य राखता आले नाही. २०१७ पासून लेडीज पीजीए टूरमध्ये सहभागी असलेली अदिती अजूनही आपल्या पहिल्या विजेतेपदाच्या प्रतीक्षेत आहे. तिच्याकडून या स्पर्धेत चांगल्या कामगिरीची अपेक्षा होती, मात्र कठीण परिस्थितीत



तिला संघर्ष करावा लागला. दरम्यान, ऑस्ट्रेलियाच्या हॅना ग्रीन हिने उत्कृष्ट खेळ करत ही स्पर्धा जिंकली. तिने अंतिम फेरीत चार-अंडर ६८ असा शानदार स्कोअर करत एकूण १७-अंडर २७१ गुणांसह विजेतेपद पटकावले.अदितीसाठी ही स्पर्धा अपेक्षेप्रमाणे न झाल्याने आता पुढील स्पर्धांकडे तिचे लक्ष असेल. सातत्यपूर्ण कामगिरी करून ती लवकरच विजेतेपद मिळवेल, अशी आशा भारतीय क्रीडाप्रेमींना आहे.

## दिल्लीचा पराभव नेमका कोणामुळे झाला? सामन्यानंतर सांगितली पराभवाची २ प्रमुख कारण

**नवी दिल्ली:** सनरायझर्स हैदराबाद आणि दिल्ली कॅपिटल्स या दोन्ही संघांमध्ये झालेल्या सामन्यात दिल्लीला पराभवाचा सामना करावा लागला आहे. दरम्यान या पराभवानंतर बोलताना अक्षर पटेल काय म्हणाला? जाणून घ्या.

आयपीएल २०२६ स्पर्धेतील ३१ वा सामना सनरायझर्स हैदराबाद आणि दिल्ली कॅपिटल्स या दोन्ही संघांमध्ये पार पडला. या सामन्यात हैदराबादने दिल्लीवर एकतर्फी विजयाची नोंद केली. पहिल्या डावात फलंदाजी करताना हैदराबादने २४२ धावांचा डोंगर उभारला होता. या धावांचा बचाव करताना हैदराबादच्या गोलंदाजांनीही अप्रतिम गोलंदाजी केली. दिल्लीला २० षटकांअखेर १९५ धावा करता आल्या. यासह हैदराबादने हा सामना ४७ धावांनी आपल्या नावावर केला. दरम्यान या पराभवानंतर दिल्लीचा कर्णधार अक्षर पटेल काय म्हणाला? जाणून घ्या.

या पराभवानंतर बोलताना अक्षर पटेल म्हणाला, ङ्गआम्ही जे रनआऊट आणि कॅच सोडले (अभिषेक शर्माच्या बाबतीत), जर आम्ही ते पूर्ण केले असते तर आम्ही त्यांना कमी धावांवर रोखू शकलो असतो. पण हो, जर एखादा फलंदाजी इतकी चांगली फलंदाजी करत असेल आणि अचूक फटके मारत असेल, तर अशा कामगिरीचे श्रेय त्याला दिलेच पाहिजे. तर दुसरीकडे क्लासेनने ज्या पद्धतीने फलंदाजी केली, ते पाहता आमच्या गोलंदाजांची काहीच चूक नव्हती.ङ्क तसेच तो



पुढे म्हणाला की, ङ्गजेव्हा एखादा फलंदाज अशा प्रकारे फलंदाजी करतो, तेव्हा प्रशिक्षक आणि कर्णधार या दोघांनीही हे स्वीकारले पाहिजे की, अशावेळी कर्णधारही काही करू शकत नाही. मी गोलंदाजांना हेच सांगत होतो की, तुम्ही जर चांगली गोलंदाजी करत असाल आणि फलंदाजाने चांगला फटका मारला तर यात तुमची काहीच चूक नाही. पण क्षेत्ररक्षण करणं मात्र आमच्या हातात होतं. कॅच पकडणं, रन आऊट करणं हे नक्कीच करू शकतो. त्या बाबतीत आम्ही आणखी चांगली कामगिरी करू शकलो असतो.

### हैदराबादचा विजय

या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सने नाणेफेक जिंकून हैदराबादला प्रथम फलंदाजी करण्याचं आमंत्रण दिलं होतं. हैदराबादकडून प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या सलामीवीर फलंदाज अभिषेक शर्माने नाबाद १३५ धावांची खेळी केली होती. तर हेनरिक क्लासेनने नाबाद ३७ धावांची खेळी केली. तर ट्रॅव्हिस हेडने देखील ३७ धावांची खेळी केली. या खेळीच्या बळावर सनरायझर्स हैदराबादने २० षटकांअखेर २ गडी बाद २४२ धावा केल्या. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या दिल्लीकडून नितीश राणाने ५७ धावांची खेळी केली. तर समीर रिझवीने ४१ धावा केल्या. केएल राहुलने ३७ धावा केल्या. हैदराबादकडून इशान मलिंगाने सर्वाधिक ४ गडी बाद केले. दिल्लीला २० षटकांअखेर ९ गडी बाद १९५ धावा केल्या. हैदराबादने हा सामना ४७ धावांनी आपल्या नावावर केला.

## लातूर जिल्ह्यात सीईटी परीक्षा केंद्रांच्या परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यात दि. २१ ते २६ एप्रिल, २०२६ या कालावधीत एमबीए, एमएमएस सीईटी आणि एमएचटी सीईटी २०२६ या सामाईक प्रवेश परीक्षांचे आयोजन करण्यात आले आहे. या पार्श्र्वभूमीवर जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी परीक्षा केंद्रांच्या १०० मीटर परिसरात भारतीय नागरी सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ लागू केले आहे. जिल्ह्यातील एकूण ६ उपकेंद्रांवर ही परीक्षा सकाळी व दुपारी अशा दोन सत्रांत ऑनलाईन पद्धतीने पार पडणार असून, या काळात केंद्रावर परीक्षार्थींची मोठी गर्दी होण्याची शक्यता असल्याने कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत. २१ ते २६ एप्रिल या कालावधीत दररोज सकाळी ९ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत हे आदेश लागू राहतील. या आदेशानुसार परीक्षा केंद्राच्या परिसरात परीक्षार्थींशिवाय पाच किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्तींना एकत्र येण्यास मनाई करण्यात आली असून, कोणत्याही प्रकारच्या घोषणा देण्यास किंवा शांततेस बाधा निर्माण होईल असे कृत्य करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. तसेच परीक्षा कालावधीत केंद्राच्या १०० मीटर परिसरातील झेरॉक्स सेंटर्स, पानटपरी, टायपिंग सेंटर, एसटीडी बूथ आणि ध्वनिक्षेपक ही सर्व माध्यमे बंद ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. परीक्षा केंद्रात मोबाईल फोन, सेल्युलर फोन किंवा इतर कोणतीही प्रसार माध्यमे घेऊन प्रवेश करण्यास मनाई असेल, तसेच कोणत्याही अनधिकृत व्यक्तीला किंवा वाहनाला केंद्र परिसरात प्रवेश दिला जाणार नाही. हे निर्बंध परीक्षा कर्तव्यावर असलेल्या अधिकारी, कर्मचारी आणि पोलीस प्रशासनास लागू नसून, परीक्षेचे कामकाज शांततेत पार पाडण्यासाठी प्रशासनाने हे प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.

## लातूर जिल्ह्यात खरीप हंगामासाठी ७५ हजार टनांहून अधिक खत साठा उपलब्ध; शेतकऱ्यांनी साठवणुकीची घाई न करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये आगामी खरीप हंगामासाठी सर्व प्रकारची रासायनिक खते पुरेशा प्रमाणात उपलब्ध असून जिल्ह्यात कोणत्याही प्रकारची खत टंचाई नसल्याची ग्वाही जिल्हा प्रशासनाने दिली आहे.



सध्या जिल्ह्यामध्ये एकूण ७५ हजार १६७ मेट्रिक टन खत साठा उपलब्ध असून, यामध्ये ३८ हजार ४४४ टन संयुक्त खते, १६ हजार ८२ टन सिंगल सुपर फॉस्फेट, ११ हजार ४३६ टन युरिया, ८ हजार ३११ टन डीएपी आणि ८९४ टन एमओपी खताचा समावेश आहे. हवामान खात्याने यंदा मान्सूनवर 'एल निनो'चा परिणाम होऊन पावसाची अनिश्र्चितता वर्तविली असल्याने, शेतकऱ्यांनी खतांची आगाऊ खरेदी करून साठवणूक करण्याची घाई करू नये, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र कदम यांनी केले आहे.

तालुकानिहाय उपलब्धतेमध्ये लातूर तालुक्यात सर्वाधिक २९३६ टन युरिया व १८२४ टन डीएपी साठा असून, अहमदपूर (युरिया १५६२, डीएपी ९४२), निलंगा (युरिया १४७३, डीएपी १३४५), औसा (युरिया १३९८, डीएपी ५७०) आणि उदगीर (युरिया ७२६, डीएपी ७३०) या तालुक्यांचा क्रमांक लागतो. तसेच चाकूर, रेणापूर, देवणी, शिरूर अनंतपाळ आणि जळकोट या तालुक्यांमध्येही खतांचा पुरेसा साठा केंद्रांवर उपलब्ध आहे. जरी आखाती देशांमध्ये युद्धजन्य परिस्थिती असली तरी त्याचा देशांतर्गत खत पुरवठ्यावर परिणाम झालेला नाही, त्यामुळे शेतकऱ्यांनी कोणत्याही अफवांवर विश्र्वास न ठेवता गरजेनुसारच खत खरेदी करावी. प्रत्येक कृषी सेवा केंद्रनिहाय उपलब्ध साठा पाहण्यासाठी शेतकऱ्यांनी प्रशासनाच्या अधिकृत ब्लॉग लिंकचा किंवा क्यूआर कोडचा वापर करावा, असेही कृषी विभागातर्फे स्पष्ट करण्यात आले आहे.

## लातूर जिल्ह्यात खरीप २०२६ साठी ११ तक्रार निवारण कक्ष स्थापन; शेतकऱ्यांनी दक्ष राहण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** खरीप २०२६ हंगामात लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना बियाणे, खते आणि कीटकनाशके यांसारख्या कृषी निविष्ठा खरेदी करताना येणाऱ्या अडचणी व गुणवत्तेबाबतच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी जिल्हास्तरावर १ आणि तालुकास्तरावर १० असे एकूण ११ तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. शेतकऱ्यांना दर्जेदार निविष्ठा एमआरपी दराने उपलब्ध व्हाव्यात आणि त्यांची फसवणूक होऊ नये, यासाठी कृषी विभागाचे गुणनियंत्रण निरीक्षक नियमितपणे विक्री केंद्रांची तपासणी करत आहेत, अशी माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र कदम यांनी दिली.

खरेदी दरम्यान किंवा हंगाम संपेपर्यंत निविष्ठांच्या दर्जाबाबत संशय आल्यास शेतकरी संबंधित तालुक्याच्या तक्रार निवारण कक्षाकडे धाव घेऊ शकतात. तक्रार करताना शेतकऱ्यांनी लेखी अर्जासोबत खरेदीची पक्की पावती, सातबारा उतारा ही कागदपत्रे जोडणे आवश्यक असून त्यावर स्वतःचा पूर्ण पत्ता व भ्रमणध्वनी क्रमांक नमूद करावा. याशिवाय, तालुका कृषी अधिकारी किंवा पंचायत समितीच्या कृषी अधिकाऱ्यांकडेही तक्रार नोंदवता येईल. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र कदम आणि जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी दीपक सुपेकर यांनी शेतकऱ्यांना केवळ अधिकृत विक्रेत्यांकडूनच निविष्ठा खरेदी करण्याचे आणि पावतीवर जात, लॉट नंबर, उत्पादन दिनांक असल्याची खात्री करण्याचे आवाहन केले आहे.

सध्या खतांच्या किमतीत कोणतीही वाढ झालेली नसून, चढ्या दराने विक्री करणाऱ्या विक्रेत्यांवर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशाराही प्रशासनाने दिला आहे. तक्रार नोंदवण्यासाठी शेतकऱ्यांनी ९४०४६८०४३७ या भ्रमणध्वनी क्रमांकावर किंवा ८७८८०९१४०१ व ७५८८१७८७८७ या व्हॉट्सप क्रमांकावर संपर्क साधावा. तसेच dsaolaturrediffmail.com किंवा adolaturgmail.com या ई-मेल आयडीवरही आपली तक्रार पाठवता येईल.

# लातूर जिल्ह्यात ९८९ रुग्णांना सुमारे ७.७२ कोटींची मदत

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून आरोग्यसेवेला गती

**लातूर/प्रतिनिधी :** शासनाच्या आरोग्यविषयक विविध योजनांमधून मदत न मिळालेल्या पात्र व गरजू रुग्णांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी 'आधार' ठरत आहे. लातूर जिल्ह्यात आर्थिक वर्षात ९८९ रुग्णांना सुमारे ७ कोटी ७२ लाख रुपयांची वैद्यकीय आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून जिल्हा कक्षाची स्थापना, पेपरलेस अर्ज प्रक्रिया, तातडीने अर्जाचा निपटारा करणे आदी सकारात्मक बदल करण्यात आले. त्यासोबतच सामंजस्य करार, क्राउड फंडिंग आदींच्या माध्यमातून समाजातील मदत करणारे रूग्णालय, धर्मादाय रूग्णालय, संस्था, दाते आदींच्या सहकार्य लाभत आहे.

मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या कार्यपद्धतीत केलेल्या सुधारणा आणि मदतीचे विविध मार्ग उपलब्ध करून दिल्याने पारदर्शकता वाढून मदत वितरणाचा वेग लक्षणीयरित्या वाढला आहे. परिणामी, अधिकाधिक पात्र रुग्णांना वेळेत आर्थिक सहाय्य मिळत आहे.

**२० गंभीर आजारासाठी मदत**

कॉक्लियर इम्प्लांट (वय वर्ष २ ते ६), हृदय, यकृत, किडनी, फुफ्फुस, बोन मॅरो, हाताचे, गुडघ्याचे प्रत्यारोपण, हिप रिप्लेसमेंट, कर्करोग शस्त्रक्रिया, रस्ते अपघात, लहान बालकांची शस्त्रक्रिया, मेंदूचे आजार, हृदयरोग, डायालिसिस, कर्करोग (केमोथेरपी/ रेडिएशन), अस्थिबंधन, नवजात शिशुंचे आजार, बर्न (भाजलेले) रुग्ण, विद्युत अपघात रुग्ण या अशा एकूण २० गंभीर आजारांसाठी अर्थसहाय्य दिले जाते.

**सामंजस्य करारातून मदतीचा मार्ग मोकळा**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, बीपीसीएल फाऊंडेशन व टाटा मेमोरियल सेंटर यांच्यात बालकांच्या कर्करोग उपचारासाठी नुकताच सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारामुळे सामाजिक दायित्व (सीएसआर) अंतर्गत उपचारांसाठी विशेष निधी उपलब्ध होणार आहे. आर्थिक अडचणी कमी होऊन गरजू बालकांना गुणवत्तापूर्ण कर्करोग उपचार सुलभ होणार आहेत.

**आर्थिक वर्षातील मदत**

१ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत राज्यातील तब्बल ४० हजार ७७६ रुग्णांना ३३३ कोटी ६ लाख ८१ हजार ५०० रुपयांची वैद्यकीय मदत देण्यात आली आहे. तर, याच कालावधीत लातूर जिल्ह्यातील ९८९ रुग्णांना सुमारे ७ कोटी ७२ लाख ९५ हजार रुपयांची आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संवेदनशील नेतृत्वातून आणि दूरदृष्टीतून लातूर जिल्ह्यातील शेकडो गरजू रुग्णांना वेळेवर वैद्यकीय मदत मिळत आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या पारदर्शक आणि गतिमान कार्यपद्धतीमुळे मदत वितरणाचा वेग वाढला असून अनेक कुटुंबांना दिलासा मिळाला आहे. कोणताही रुग्ण उपचाराअभावी वंचित राहू नये, हा निर्धार आहे. अधिक माहितीसाठी व सहाय्यासाठी १८०० १२३ २२११ या टोल-फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षाचे कक्ष प्रमुख रामेश्र्वर नाईक यांनी केले आहे.



## शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये श्री देशीकेंद्र विद्यालयाची सुसज्ज इमारत उभी राहील- टाकळीकर

**लातूर/प्रतिनिधी :** महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित श्री देशीकेंद्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाची शैक्षणिक, सांस्कृतिक आणि क्रीडा आदि सर्व सुख-सोईनीयुक्त सुसज्ज वास्तु पुढील शैक्षणिक वर्ष २०२६-२७मध्ये उभी राहील असा आशावाद महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर यांनी व्यक्त केला.

जगतज्योती महात्मा बसवेश्र्वर जयंती आणि अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर श्री देशिकेंद्र विद्यालयाच्या प्रस्तावित नवीन इमारतीचा भूमिपूजन सोहळा आज संपन्न झाला. यावेळी ते बोलत होते.




याप्रसंगी महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे, कोषाध्यक्ष विजयकुमार रेवडकर, कार्यकारी संचालक प्रदीप दिंडेगावे, मुख्याध्यापक शिवाजी कोळी, उप मुख्याध्यापक शिवानंद स्वामी, पर्यवेक्षक मनोज दानाई, विलास शेळके, संस्था कार्यालयीन प्रमुख गुरुलिंग शेटे, नागेश चौधरी आणि विद्यार्थी अर्णव नागेश चौधरी यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना अध्यक्ष आदिनाथ सांगवे म्हणाले की, धर्मवीर श्री देशीकेंद्र महाराज यांच्या अथक परिश्रमातून महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्था स्थापन झाली. त्यांनी आपल्या संपूर्ण आयुष्यामध्ये शिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व दिले. समाजामध्ये माधुकरी मागून त्यांनी वस्तीगृहातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची सोय केली. धर्मवीर श्री देशीकेंद्र महाराजांच्या नावाने चालणाऱ्या या विद्यालयाने मागील अनेक वर्षापासून निकालाची उज्वल परंपरा अबादीत राखली आहे. या शाळेतून शिक्षण घेतलेले विद्यार्थी हे उच्च विद्याविभूषित असून देशातील प्रत्येक कानाकोपऱ्यामध्ये उत्कृष्ट पद्धतीने राष्ट्रीय सेवा करीत आहे.

आपल्या सर्वांच्या सहकार्याने नवीन वास्तू विद्यार्थी आणि पालकांच्या सेवेत लवकरच उपलब्ध होईल असे मत कोषाध्यक्ष विजयकुमार रेवडकर आणि कार्यकारी संचालक प्रदीप दिंडेगावे यांनी व्यक्त केले.

उपस्थित सर्व संस्था पदाधिकारी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांचे मुख्याध्यापक शिवाजी कोळी यांनी आभार व्यक्त केले.

## खरोळा येथे सामुदायिक उपनयन संस्कार सोहळा

**रेणापूर/प्रतिनिधी :** तालुक्यातील खरोळा येथील श्री दत्त मंदिर देवस्थान व गावातील ब्राह्मण समाजाच्या वतीने गुरुवार दि. ७ मे रोजी सामुदायिक उपनयन संस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

दरवर्षी हा उपक्रम राबवला जातो. या सोहळ्यासाठी नाममात्र शुल्क आकारले जाते. त्यात सोहळ्यासाठी येणाऱ्या प्रत्येक बटू सोबत ५० नातेवाईकांची भोजनाची व्यवस्था केली जाते. विधीसाठी लागणारे साहित्य तसेच बटूसाठी आवश्यक वस्तूही पुरविल्या जातात. दूरवरुन येणाऱ्यासाठी मुक्कामाची व्यवस्थाही केली जाते. या सोहळ्यात सहभागी होण्यासाठी पूर्व नोंदणी करणे आवश्यक आहे.

इच्छुकांनी नाव नोंदणी करावी, असे आवाहन श्री दत्त मंदिर देवस्थान विश्वस्त मंडळ तसेच विजयकुमार ताथोडे, अरुण पाठक, विठ्ठलराव आनंदगोसावी, विनायक जोशी,प्रभाकर कुलकर्णी,संतोष कुलकर्णी, गजानन जोशी,अवधूत पुराणिक,अनिल कुलकर्णी,गणेश घुंगर्डे,मंदार घुंगर्डे,अजय कुलकर्णी व गणेश विद्वत यांच्या वतीने करण्यात आले आहे.इच्छुकांनी देवस्थानचे सचिव संजय राऊतराव ( संपर्क क्र. ९७३०७०१०६०) व विजयकुमार ताथोडे (९४२२७१७९२०)यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## राज्यस्तरीय विकासरत्न प्रेरणा पुरस्कार सोहळ्यात लातूरचे पत्रकार संतोष सोनवणे सन्मानित

**मुंबई/प्रतिनिधी :** समृद्धी पर्यटन सांस्कृतिक विकास सेवा ट्रस्टच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय विकासरत्न प्रेरणा पुरस्कार व समृद्धी कला सादरीकरण सोहळा २०२६ हा भव्य कार्यक्रम रविवार, दि. १९ एप्रिल २०२६ रोजी कांदिवली (पूर्व), मुंबई येथील अशोक सावंत हॉलमध्ये उत्साहपूर्ण वातावरणात मोठ्या दिमाखात संपन्न झाला. विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा अत्यंत आकर्षक आणि संस्मरणीय ठरला.

या सोहळ्यात लातूर येथील दैनिक जगमित्रचे जिल्हा प्रतिनिधी, पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते संतोष सोनवणे यांना त्यांच्या पत्रकारिता व सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय, सातत्यपूर्ण व प्रभावी कार्याची दखल घेऊन प्रतिष्ठित विकासरत्न प्रेरणा पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. सन २०१७ पासून पत्रकारितेत सक्रिय असलेल्या सोनवणे यांनी समाजातील विविध ज्वलंत प्रश्र्नांवर निर्भीडपणे आवाज उठवत जनजागृती केली असून, त्यांच्या कार्यामुळे समाजात सकारात्मक बदल घडून येण्यास मोलाचा हातभार लागला आहे.

मान्यवरांची उपस्थिती:

या सोहळ्यास अध्यक्ष म्हणून ज्येष्ठ साहित्यिक, गीतकार व समाजकार्यकर्ते ॲड. बाळासाहेब तोरस्कर उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून आमदार प्रकाशदादा सुर्वे यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे उद्घाटन पोलीस सब इन्स्पेक्टर मंगेश अनंत नाईक यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून करण्यात आले. स्वागताध्यक्ष व संयोजिका म्हणून सौ. मीनाक्षी महादेव पाखरे यांनी उपस्थित मान्यवरांचे मनपूर्वक स्वागत केले, तर ट्रस्टचे सचिव महेश महादेव पाखरे यांनी कार्यक्रमाचे सुयोग्य नियोजन व यशस्वी आयोजन केले.

यावेळी राष्ट्रीय सुवर्णपदक प्राप्त प्राध्यापिका व ज्येष्ठ साहित्यिका डॉ. अलका नाईक तसेच डॉ. रावसाहेब नाना घोडेराव यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करत प्रेरणादायी विचार मांडले. त्यांनी समाजातील सकारात्मक परिवर्तनासाठी प्रत्येकाने आपल्या क्षेत्रात प्रामाणिकपणे व जबाबदारीने कार्य करण्याचे आवाहन केले.

प्रमुख पाहुणे आमदार प्रकाशदादा सुर्वे यांच्या हस्ते पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. आपल्या भाषणात त्यांनी



पत्रकारिता व समाजकार्य हे लोकशाहीचे भक्कम आधारस्तंभ असल्याचे सांगत, समाजहितासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींना प्रोत्साहन देणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन केले. सोहळ्यात कला, क्रीडा, साहित्य व चित्रपट क्षेत्रातील अनेक मान्यवरांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. तसेच विविध रंगतदार सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली व कार्यक्रमाची शोभा अधिक खुलवली.

कार्यक्रमास सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व पत्रकारिता क्षेत्रातील अनेक मान्यवर, कार्यकर्ते, साहित्यिक, कलाकार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण, प्रेरणादायी व संस्मरणीय ठरला.

उत्कृष्ट नियोजन व भोजन व्यवस्थेची विशेष दखल कार्यक्रमासोबतच आयोजकांच्या वतीने उपस्थित मान्यवर व पाहुण्यांसाठी अत्यंत सुंदर, सुटसुटीत व नियोजनबद्ध पद्धतीने भोजनाची उत्कृष्ट व्यवस्था करण्यात आली होती. स्वच्छता, शिस्तबद्धता आणि रुचकर खाद्यपदार्थ यामुळे उपस्थितांनी समाधान व्यक्त करत आयोजकांचे मनापासून कौतुक केले. या व्यवस्थेमुळे कार्यक्रमाला अधिक चारचाँद लागले.

## लातूर विभागीय कृषी सहसंचालक कार्यालयात तक्रार निवारण कक्ष स्थापन

**लातूर/प्रतिनिधी :** खरीप २०२६ हंगामाच्या अनुषंगाने शेतकरी आणि कृषी निविष्ठा विक्रेत्यांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी लातूर येथील विभागीय कृषी सहसंचालक कार्यालयात विशेष तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. जुने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पाठीमागे असलेल्या या कार्यालयातील गुण नियंत्रण कक्षात नितीन सोनटक्के यांची पूर्णवेळ नियुक्ती करण्यात आली असून, कोणत्याही तक्रारीसाठी अथवा माहितीसाठी त्यांच्याशी ८२७५४८७४०० या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधता येईल.

या कक्षाच्या कामकाजासाठी तंत्र अधिकारी (गुण नियंत्रण) बी. बी. मुंडे (भ्रमणध्वनी क्र. ७८२१८३०९०७) आणि विभागीय गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक ए. एन. तिडके (भ्रमणध्वनी क्र. ९६०४८८३०८५) हे समन्वयक म्हणून कार्यरत राहतील. शेतकरी, वितरक किंवा विक्रेते यांना कृषी निविष्ठांच्या दर्जाबाबत काही शंका असल्यास अथवा तांत्रिक अडचणी असल्यास त्यांनी या कक्षाशी किंवा कृषी विभागाच्या १८००२३३४००० या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन विभागीय कृषी सहसंचालक कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.
शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

## आदर्श गुरुगौरव पुरस्कारासाठी प्रा.नाजेमा अब्बास शेख यांची निवड



**लातूर/प्रतिनिधी :** काझी मोहल्ला येथील रुकया बेगम उर्दू गर्ल हायस्कूल शिक्षिका प्रा.नाजेमा अब्बास शेख यांच्या कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद लातूरच्यावतीने आदर्श शिक्षक गुरुगौरव पुरस्काराने प्रा.नाजेमा शेख यांचा सन्मान करण्यात येणार आहे. सदरील पुरस्कार हा गुरुवार, दि.२३ एप्रिल २६ रोजी दयानंद सभागृह येथे मान्यवरांच्या उपस्थितीत सहकुटुंब सहपरिवार दिला जाणार आहे. प्रा.नाजेमा शेख यांची आदर्श शिक्षक गुरुगौरव पुरस्कारासाठी निवड झाल्याबद्दल डॉ. अफ़सर बाबा शेख, प्रा. सुलेमान अफसर शेख, प्रा. कसेरी याहय्या, अहेमदखान पठाण, इंजि.शेख मुख्तार हाफेज, प्रा. शफियोद्दीन शेख, डॉ. खलील सिद्दीकी, प्रा. सलीम महमंद हाजी आळंद, डॉ. संजय जमदाडे, प्रा. काळे डी. जी., प्रा. शिंदे एस. पी., प्रा .आबेद खान, प्रा. बोंदर व्ही. ए., प्रा. तोडकर एम.के., प्रा. भोसले एम. के., प्रा. अझहर सर, शेख . एम. एच. श्रीमती प्रा. पोटे एम. एम., श्रीमती प्रा. काटे एम.पी., श्रीमती प्रा. काझी आय. झेड. यांच्यासह आदींनी अभिनंदन केले आहे.

# महात्मा बसवेश्वरांनी मूल्याधिष्ठित समाजाची निर्मिती केली - इंजि. किरण कोरे

**निलंगा/आयुब बागवान :** बाराव्या शतकात महात्मा बसवेश्वरांनी समाजातील अनिष्ट, रूढी परंपरा , कर्मठपणा नाकारून वचन साहित्याच्या माध्यमातून वैचारिक क्रांती घडवून आणली. कायक वे कैलास हा मूलमंत्र देऊन महात्मा बसवेश्वरांनी सर्वप्रथम जगाला श्रमाचे महत्त्व पटवून देत समाजात सामाजिक समतेचे मूल्य व माणुसकीचा विचार रुजवण्याचा प्रयत्न केला असल्याचे प्रतिपादन इंजि. किरण कोरे यांनी केले.

निलंगा येथे महात्मा बसवेश्वर जयंती निमित्त लिंगायत समाज व साई क्रिटिकेअर हॉस्पिटल निलंगा यांच्या संयुक्त विद्यमाने बसवेश्वर नगर येथील महात्मा बसवेश्वर सार्वजनिक वाचनालयात आयोजित व्याख्यानात इंजि. किरण कोरे बोलत होते.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मठाधिपती मनिप्र संगनबसव महास्वामीजी होते. यावेळी शिवाजी रेशमे गुरुजी, डॉ. मन्मथ गताटे , व्याख्याते इंजिनियर किरण कोरे, डॉ. अरविंद भातांब्रे, अजय शिवणे, शुभम शेरसांडे आदी विचारपीठावर उपस्थित होते.

पुढे बोलताना इंजि. किरण कोरे म्हणाले, १२ व्या शतकात महात्मा बसवेश्वरांनी अंधश्रद्धा,जातीभेद , न मानता श्रम हीच पूजा हा मूलमंत्र देत क्रांती घडवून आणली. १२ व्या शतकात पहिली लोकशाही कसे असते ते अनुभव मंटप च्या माध्यमातून जगाला दाखऊन दिले.

सर्वांच्या मनात महात्मा बसवेश्वरांचे विचार,कार्य , वचन रुजवले पाहिजे आणि याची सुरुवात सर्वांनी आपल्या घरातून केले पाहिजे .महात्मा बसवेश्वर यांची प्रतिमा डोक्यावर घेऊन जयंतीच्या कार्यक्रमात नाचण्यापेक्षा महापुरुषांचे विचार विचार डोक्यात घेणे काळाची गरज असल्याचे किरण कोरे यांनी सांगितले .

महात्मा बसवेश्वरांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता, स्त्री-पुरुष समानता व श्रमप्रतिष्ठेचा संदेश दिला.

इंजि. किरण कोरे यांनी आपल्या ओजस्वी वाणीने महात्मा बसवेश्वरांचे कार्य उपस्थितांसमोर मांडले. अनुभव मंटपाची संकल्पना व वचन साहित्याचे आजच्या काळातील महत्त्व त्यांनी सोप्या भाषेत समजावून सांगितले. त्यांच्या प्रभावी वक्तृत्वाने श्रोते मंत्रमुग्ध झाले होते. यावेळी संगन बसव महास्वामीजी यांचे समायोचित भाषण झाले.

व्याख्यानाच्या सुरुवातीला निलंगा अनुभव मंटपाच्या महिला शरणी कल्पना सोरडे, शोभाताई सलगरे, निर्मला सोरडे, संगीता गडवंती यांनी वचन सादर केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आयोजक डॉ. अरविंद भातांब्रे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक इंजि. एम के कस्तुरे यांनी केले. आभार डॉ मन्मथ गताटे यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी, प्रकाश शेटकार, युवराज बिराजदार, चक्रधर शेळके, ,बुद्धिवंत मुळे, बसवराज बसपुरे, संतोष सोरडे, प्रकाश पटणे, अशोक शेटकार, संजय स्वामी, मल्लिकार्जुन कोळळे, व साई क्रिटिकेअर हॉस्पिटल चे कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. यावेळी बसव प्रेमी नागरिक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संस्थेच्या पोलीस सभासदांना पोलीस अधीक्षक यांचे हस्ते हेल्मेट वाटप

**लातूर/प्रतिनिधी :** राज्यातील वाढत्या रस्ते अपघातांच्या पार्श्वभूमीवर मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या आदेशानुसार महाराष्ट्र पोलीस दलातील अधिकारी व अंमलदारांसाठी दुचाकीस्वारांच्या सुरक्षेसाठी हेल्मेट, व चार चाकी स्वारासाठी सीट बेल्ट वापरणे सक्तीचे करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांचे आदेशान्वये लातूर पोलीस दलातील सर्व अधिकारी आणि अंमलदार दुचाकी वाहन चालविणाऱ्यांना हेल्मेट व चार चाकी वाहन चालवणारा सीट बेल्ट वापरणे सक्तीचे करण्यात आले आहे.



लातूर पोलिसांच्या लातूर जिल्हा पोलीस अधिकारी व कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित लातूर यांनी लातूर पोलीस दलातील अधिकारी व अमलदारांनी वाहन चालविताना हेल्मेटचा वापर करावा यासाठी पतसंस्थेचे सभासदांना हेल्मेट वाटप करण्याचा मानस पोलीस अधीक्षक यांना दाखविला. त्यानुसार पोलीस अधीक्षकांच्या संमतीने लातूर जिल्हा पोलीस अधिकारी व कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या. लातूर यांच्या वतीने संस्थेतील ठेवीदार व आर.डी. धारक सभासदांना मोफत आयएसआय (खडख) प्रमाणित हेल्मेटचे वाटप करण्याचा निर्णय घेण्यात आला. दिनांक २० एप्रिल २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता पोलीस अधीक्षक कार्यालयात सभासदांना हेल्मेट वाटप कार्यक्रम पार पडला. सदर कार्यक्रमात पहिल्या टप्प्यात ५० पोलीस अंमलदार/संस्थेचे सभासद ठेवीदार यांना हेल्मेट चे पोलीस अधीक्षक श्री अमोल तांबे, अपर पोलिस अधीक्षक श्री मंगेश चव्हाण यांचे हस्ते वाटप करण्यात आले असून आणखीन दीड हजार पोलिसांना पतसंस्थेकडून हेल्मेटचे मोफत वाटप करण्यात येणार आहेत.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी सदर कार्यक्रमादरम्यान सांगितले की, उपलब्ध आकडेवारीनुसार, रस्ते अपघातांमध्ये होणाऱ्या मृत्यूंपैकी सुमारे ८० टक्के मृत्यू हे हेल्मेटचा वापर न केल्यामुळे होतात. दुचाकीवरून प्रवास करताना हेल्मेट हे डोक्याचे व मेंदूचे संरक्षण करणारे अत्यावश्यक साधन आहे. अपघाताच्या वेळी होणारा जोरदार आघात हेल्मेट शोषून घेत असल्यामुळे गंभीर दुखापती टाळल्या जातात आणि मृत्यूचा धोका लक्षणीयरीत्या कमी होतो. त्यामुळे हेल्मेट हे केवळ दंड टाळण्यासाठी नव्हे, तर जीव वाचविण्यासाठी अत्यावश्यक असल्याचे सांगितले.

पोलीस दल हे समाजाच्या सुरक्षेसाठी दिवस-रात्र कार्यरत असलेले फ्रंटलाइन यंत्रणा असून, अनेकदा ड्युटीच्या धावपळीत स्वतःच्या सुरक्षिततेकडे दुर्लक्ष होत असल्याचे आढळते. अनियमित कामाचे तास, ताणतणाव व सततची हालचाल यामुळे पोलीस कर्मचारीही अपघाताच्या जोखमीला सामोरे जातात. अशा घटनांमध्ये पोलीस कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबावर मोठे संकट ओढवते. या पार्श्वभूमीवर पोलीस दलाने स्वतःपासून सुरुवात करून सुरक्षिततेचा आदर्श निर्माण करण्याचा निर्धार केला आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे व अपर पोलीस अधीक्षक श्री. मंगेश चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पतसंस्थेचे चेअरमन श्री. परमेश्वर जनक ढेकणे, सचिव नामदेव सारोळे, गोविंद सरवदे, खुर्रम काझी माधव, माधव केंद्रे, आयुब शेख, नवनाथ कल्याने, श्रीमती दीपिका शिवलकर व अनुराधा मेहकर तसेच सभासद मोठ्या संख्येने सभासद उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान हेल्मेटचे महत्त्व अधोरेखित करत सर्वांना नियमित वापर करण्याचे आवाहन करण्यात आले.

पतसंस्थेकडून पोलिसांच्या सुरक्षितेसाठी मोफत हेल्मेट वाटप करण्यात येत असलेल्या उपक्रमाबद्दल पोलीस अधीक्षक अमोल तांबे अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांनी पतसंस्थेच्या पदाधिकाऱ्यांचे कौतुक केले आहे.

## ४२.८ अंश तापमानात शेतात राबणाऱ्या शेतकऱ्याचा उष्माघाताने अंत! निलंगा तालुक्यातील घटना

**औराद शहाजानी/मोईज सितारी :** निलंगा तालुक्यातील औराद शहाजानी परिसरात उन्हाची तीव्रता कमालीची वाढली असून, सोमवारी एका शेतकऱ्याचा उष्माघाताने मृत्यू झाल्याचे समजते. लक्ष्मण दादाराव भंडारे (वय ६०) असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे. गेल्या पंधरा दिवसांपासून या भागात तापमानाचा पारा ४० अंशांच्या पुढे असून, सोमवारी तो थेट ४२.८ अंशांवर पोहोचला होता.



शेतात काम करताना कोसळलेलक्ष्मण भंडारे सोमवारी दुपारी चार वाजेच्या सुमारास आपल्या शेतात काम करत होते. प्रखर उन्हामुळे त्यांच्या शरीरातील पाण्याची पातळी अचानक कमी झाली आणि ते जमिनीवर कोसळले. त्यांना तात्काळ औराद येथील खासगी रुग्णालयात नेण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर त्यांची प्रकृती अधिकच खालावल्याने डॉक्टरांनी त्यांना निलंगा येथे हलवण्यास सांगितले, मात्र वाटेतच त्यांची प्राणज्योत मालवली.

**पाणी पातळी कमी झाल्याने झटका**

उन्हाची तीव्रता अधिक असल्याने लक्ष्मण भंडारे यांच्या शरीरातील पाण्याची पातळी कमी झाली आणि त्यांना तीव्र हृदयविकाराचा झटका आला, अशी माहिती औराद येथील डॉ. मल्लिकार्जुन शंकद यांनी दिली. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा आणि पाच मुली असा मोठा परिवार आहे. त्यांच्यावर मंगळवारी अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

# रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रलच्या उच्चतम व्यावसायिक पुरस्काराचे वितरण

**लातूर/प्रतिनिधी :** रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रलच्या उच्चतम व्यावसायिक पुरस्काराचे वितरण नुकतेच मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

लातूर शहरात सामाजिक कार्यामध्ये रोटरी अग्रगण्य आहे त्याचाच एक भाग म्हणून समाजातील उच्चतम व्यावसायिक मूल्य जतन करून व्यवसाय करणारे व्यावसायिक यांना हा पुरस्कार दिला जातो. रोटरी क्लब लातूर सेंट्रलचे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर व्हिजिट पब्लिक फंक्शन हॉटेल भारत फाईन डाईन या ठिकाणी संपन्न झाले. ज्यामध्ये लातूर शहरातील प्रख्यात डॉ. शिरीष मस्के पाटील वैद्यकीय व्यवसाय त्याचबरोबर डॉ. धीरज मानकरी जीवन किसान ॲग्रो, सचिन बांगड ॲडमिशन मेड इझी, शैलेंद्र बलदोटा गुरु गणेश डमिडीया ॲंड प्रिंटर्स, फिरोज पठाण एस. एम. आर. कॅन्टीन त्याचबरोबर रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ द्वारा दिला जाणारा सेवा विशेष पुरस्कार सौ. ज्योती धोंडीराम शिंदे, महिला आरोग्य चळवळीतील प्रमुख तसेच संजय शंकरराव मंडाळे यांना दिव्यांग व्यक्तीचे उल्लेखनीय कार्य यासाठी प्रदान करण्यात आले.




याप्रसंगी व्यासपीठावर प्रमुख मार्गदर्शक म्हणून रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ चे प्रांतपाल सुधीर लातूरे, सौ. संगीता सुधीर लातूरे, सहाय्यक प्रांतपाल एड. श्रीराम देशपांडे व सौ प्रतिभा श्रीराम देशपांडे, डिस्ट्रिक्ट सेक्रेटरी डॉ. राजगोपाल तापडिया, रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रलचे अध्यक्ष बाळासाहेब खैरे , सौ. ऋतुजा बाळासाहेब खैरे, सचिव डॉ.नेताजी शिंगटे, सौ.शितल नेताजी शिंगटे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रकल्प प्रमुख सुदर्शन कांबळे हे होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हेमंत रामढवे व रवींद्र चामले यांनी केले. कार्यक्रमास रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रलचे माजी अध्यक्ष, बोर्ड ऑफ डायरेक्टर्स तथा सर्व सदस्य सहपरिवार उपस्थित होते.

## खरा समारंभ..

नाजूकक्षणे व्यापला
खरा निरोप समारंभ
एक जिम्मेदारी सरते
नव्याकार्याचा आरंभ

भावनाविवश दिवस
बोलू लागे मुख स्तंभ
मोकळेपणानेचालले
कुणी न करे अवष्टंभ

फोटोसेशन वेळसाधे
मध्येचं घुसे उपटसुंभ
जीवलग दोस्तनिवृत्त
जागृत करतो विश्रंभ

खुर्चीवरी असे जेंव्हा
अंगात उसळला दंभ
अधिकार अधि राज्य
उन्मळला अहम् कुंभ

सत्तेवरून पाय उतार
तरीही न उतरलाजंभ
सत्तापाठबळ निखळे
भुस भुशीत रे उपष्टंभ

निर्वाण मार्गे परिक्रमा
नवीन आयुष्य प्रारंभ
नव्याव्याधी मित्रासम
आजारपण दे परिरंभ

मावळतीचा सूर्य पहा
संध्या समय अविलंब
जगून घ्यावे उतारवय
बदल स्वतात अवलंब

**– हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६

## माजी खासदार दिवंगत गोपाळरावजी पाटील यांच्या निधना संदर्भात लातूर जिल्हा बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांची प्रतिक्रिया



**लातूर/प्रतिनिधी :**शिवछत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व संस्थापक, ज्येष्ठ बालरोगतज्ज्ञ, आणि लातूर जिल्ह्याचे माजी खासदार आदरणीय डॉ. गोपाळरावजी पाटील (आप्पा) यांचे दुःखद निधन झाले. ही बातमी अत्यंत वेदनादायी आहे.

डॉ. गोपाळरावजी पाटील यांनी वैद्यकीय क्षेत्रात केवळ सेवाच दिली नाही, तर शिक्षण क्षेत्रात 'शिवछत्रपती शिक्षण संस्थेच्या' माध्यमातून हजारो विद्यार्थ्यांचे भवितव्य घडवले. एक संयमी, सुसंस्कृत आणि ऋषितुल्य व्यक्तिमत्व म्हणून ते सदैव स्मरणात राहतील. त्यांच्या निधनाने लातूर जिल्ह्याच्या शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्राची कधीही न भरून निघणारी हानी झाली आहे.वैद्यकीय, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात त्यांनी केलेले उल्लेखनीय कार्य सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. त्यांनी आयुष्यभर जपलेली मूल्ये, तत्त्वनिष्ठता आणि सेवाभाव यांचा वारसा पुढे नेणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल.

आदरणीय आप्पांना भावपूर्ण श्रद्धांजली! ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो आणि पाटील परिवाराला या दुःखातून सावरण्याची शक्ती देवो ही प्रार्थना.

# म.बसवेश्वर महाविद्यालयातील प्रो.डॉ.शिवप्रसाद डोंगरे यांचा सत्कार

**लातूर/प्रतिनिधी :** महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर येथील वाणिज्य विभागात कार्यरत असलेले प्रो.डॉ. शिवप्रसाद डोंगरे यांची महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने चालणाऱ्या 'करियर कट्टा' या उपक्रमांतर्गत लातूर जिल्ह्यासाठी जिल्हा समन्वयक (शहर) म्हणून नुकतीच निवड करण्यात आली आहे. त्याबद्दल त्यांचा सत्कार महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर यांच्या हस्ते करण्यात आला.



यावेळी संस्थेचे कार्यकारी संचालक प्रदीप दिंडेगावे, माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष प्रा.कल्याण कांबळे, डॉ.सिद्धार्थ सूर्यवंशी, मुख्य समन्वयक प्रो.डॉ.नल्ला भास्कर रेड्डी, उपप्राचार्य प्रा.नितीन वाणी आणि डॉ.रत्नाकर बेडगे उपस्थित होते.

डॉ.डोंगरे यांची शैक्षणिक व संशोधन क्षेत्रात भक्कम वाटचाल असून त्यांना ३० वर्षाचा शैक्षणिक अनुभव आहे. तसेच त्यांच्या नावे चार पेटंट्स नोंदणीकृत आहेत आणि त्यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये साधन व्यक्ती म्हणून कार्य केले आहे. भूतान व थायलंड या देशाचा शैक्षणिक दौराही त्यांनी केला आहे. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाकडून व विद्यापीठ अनुदान आयोगाकडून त्यांना तीन लघुशोध प्रबंध प्राप्त झाले असून ते त्यांनी पूर्ण केलेले आहेत. त्यांनी 'वाणिज्य व व्यवस्थापन' या विषयावर पाच पुस्तके लिहिलेली आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखली तीन विद्यार्थ्यांनी पीएच. डी. पदवी पूर्ण केलेली असून उर्वरित पाच विद्यार्थी त्यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधनाचे काम उत्तमरित्या करीत आहेत. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि कमला कॉलेज, कोल्हापूर या ठिकाणच्या वाणिज्य आणि व्यवस्थापन विषयाच्या अभ्यास मंडळावर सदस्य म्हणून ते कार्यरत आहेत.

भारतीय वाणिज्य परिषद, नवी दिल्ली दिल्लीचे कार्यकारी संचालक होते व महाराष्ट्र कॉमर्स टीचर्स असोसिएशन, मुंबईच्या कार्यकारी संचालक मंडळावर सदस्य म्हणून आहेत. युथ इम्पॉवरमेंट ॲंड रिसर्च असोसिएशन, वाराणसी - महाराष्ट्र चाप्टरचे जॉइंट सेक्रेटरी आहेत.

मागील पंधरा वर्षापासून राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने त्यांना 'उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी' म्हणून पुरस्कारीत केलेले आहे. तसेच त्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागीय समन्वयक म्हणून कार्य केले आहे. त्यांना अनेक शैक्षणिक आणि सामाजिक संस्थांनी उत्कृष्ट शिक्षक म्हणून सन्मानित केलेले असून अनेक सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक प्रतिष्ठानावर त्यांचे कार्य सुरू आहे. त्यांनी वेगवेगळ्या विषयावर अनेक व्याख्याने दिलेली आहेत. विशेषतः ते ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी करिअर कार्यक्रमाचे आयोजन करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात.

त्यांच्या या निवडीबद्दल संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे, उपाध्यक्ष माधवराव पाटील तपसे चिंचोलीकर, सहसचिव सुनील मिटकरी, कोषाध्यक्ष विजयकुमार रेवडकर, कार्यकारी संचालक प्रदीप दिंडेगावे आणि सर्व सन्माननीय संस्था पदाधिकारी, प्राचार्य, मुख्य समन्वयक, डॉ.आनंद शेवाळे, डॉ.व्ही. आर. सोनी, डॉ.रत्नाकर बेडगे, डॉ.संजय गवई यांच्यासमवेत शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले आहे.

टोनर रिफिलिंग
फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट
ड्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग

निलंगा शहरातील
एलआयसी
विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स,
जनता दवाखान्यासमोर
शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लब मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224,
9422612239,
9422658396

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade    Mo. 9422472502,    RNI 47034/64,    POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे.    मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२    आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६